

संविधान गौरव दिनानिमित्त
भारतरत्न
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
यांना कोटी कोटी अभिवादन !
समाजसेवक
मा.श्री. अविनाश देडगांवकर
तुमच्या सामाजिक सेवेला 'सलाम तुला' पुरस्कारप्राप्त
अहिल्यानगर

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २७.११.२०२६ | अंक नं. २०० | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक

नगरकर खवय्यांच्या पसंतीस उतरलेला
साऊथ इंडियन
Sambar®
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
एल.जी.शोरुम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो. 85306 40202
पार्सल सुविधा उपलब्ध..

यंदाची सुवर्णखरेदी, भरघोस फायद्याची..
दिवाळी धमाका ऑफर
₹999/-* प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची)
+
₹111/-* चांदी चक्क फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)
सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे 11 एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी*
(प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)
ऑफर कालावधी - 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
बुधवार चालु
Conditions Apply*



थंडीचे कपडे...
जन्मलेल्या बाळापासून मोठ्या महिला व पुरुषांसाठी, मुला-मुलींसाठी...
स्वेटर्स,जॅकेट, जर्कीन, टोपी, उलन स्टोल,मफलर, सॉक्स,स्वग व
अजून बरेच काही आणि तेही रास्त दरात
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

जन्म-मृत्यू नोंदणीतील चुकीच्या माहितीचा नागरिकांना मनस्ताप; दुरुस्ती करण्यासाठी वारंवार महानगरपालिकेत होताहेत 'हेलपाटे'

नगर - अहिल्यानगर महानगरपालिकेच्या हद्दीतील जन्म-मृत्यू नोंदणी प्रक्रियेत काही रुग्णालयांकडून पाठविण्यात येणाऱ्या चुकीच्या व अपूर्ण माहितीमुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. रुग्णालयात बाळाचा जन्म झाल्यानंतर संबंधित रुग्णालयाने जन्मनोंदणीसाठी आवश्यक असलेली माहिती अचूक आणि पूर्ण स्वरूपात महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडे पाठविणे अपेक्षित असताना, माहितीतील त्रुटींमुळे नागरिकांना जन्मदाखला मिळविण्यासाठी तसेच त्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी वारंवार महापालिकेच्या कार्यालयात चकरा माराव्या लागत आहेत. या प्रकाराकडे महापालिका प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे मत प्रमोदकुमार छाजेड यांनी व्यक्त केले.

बाळाचा जन्म रुग्णालयात झाल्यानंतर जन्मनोंदणीची प्राथमिक जबाबदारी संबंधित रुग्णालय प्रशासनाची असते. मात्र, जन्मनोंदणी करताना आई-वडिलांची नावे, जन्मतारीख, जन्मस्थळ, पत्ता, आवश्यक ओळख तपशील आदी माहिती अचूक भरणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विशेषतः आई आणि वडिलांच्या आधारकार्डवरील नावांची अचूक नोंद, संपूर्ण पत्ता आणि पिनकोडसह माहिती घेतल्यास भविष्यात जन्मदाखल्यामध्ये चुका होण्याचे प्रमाण कमी होऊ शकते. रुग्णालयाने माहिती पाठविण्यापूर्वी ती पालकांकडून तपासून घेण्याची व्यवस्था करावी, अशी अपेक्षाही छाजेड यांनी व्यक्त केली.

काही रुग्णालयाकडून मिळते अर्धवट माहिती

रुग्णालयाकडून पाठविण्यात आलेल्या माहितीमध्ये नावाचे स्पेलिंग चुकीचे असणे, आई-वडिलांच्या नावात तफावत असणे, पत्त्याची अपूर्ण नोंद, गाव किंवा शहराच्या नावातील चुका, पिनकोडचा अभाव अशा त्रुटी राहिल्यास त्याचा त्रास संबंधित कुटुंबाला सहन करावा लागतो. जन्म दाखला तयार झाल्यानंतर त्यामध्ये चूक आढळल्यास दुरुस्तीची प्रक्रिया करावी लागते. यासाठी नागरिकांना आवश्यक कागदपत्रे गोळा करणे, अर्ज करणे आणि संबंधित कार्यालयात वारंवार जावे लागते. अनेकदा नोकरी-व्यवसाय सोडून नागरिकांना या कामासाठी वेळ द्यावा लागतो. ही परिस्थिती बदलणे आवश्यक आहे.

जन्मनोंदणीप्रमाणेच मृत्यू नोंदणीच्या बाबतीतही रुग्णालयांनी विशेष दक्षता घेणे गरजेचे आहे. मृत व्यक्तीचे नाव, वय, पत्ता, मृत्यूची तारीख आणि इतर आवश्यक तपशील योग्य पद्धतीने नोंदविणे आवश्यक आहे. मृत्यू दाखल्यामध्ये चुकीची माहिती असल्यास वारस नोंद, विमा, बँक व्यवहार, मालमत्तेसंबंधी कामे तसेच विविध शासकीय प्रक्रियांमध्ये नागरिकांना अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे जन्म आणि मृत्यू या दोन्ही नोंदणी प्रक्रियांमध्ये अचूकतेला सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे.

अहिल्यानगर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने शहरातील सर्व शासकीय व खासगी रुग्णालयांना जन्म-मृत्यू नोंदणीबाबत स्पष्ट सूचना द्याव्यात. प्रत्येक रुग्णालयाकडून महानगरपालिकेकडे पाठविण्यात येणाऱ्या माहितीची वेळोवेळी तपासणी करावी. कोणत्या रुग्णालयाकडून वारंवार चुकीची किंवा अपूर्ण माहिती पाठविली जात आहे, याचा रुग्णालयनिहाय आढावा घ्यावा. वारंवार चुका करणाऱ्या रुग्णालयांना नोटिसा देऊन नियमानुसार कारवाई करावी. तसेच जन्म-मृत्यू नोंदणीसाठी जबाबदार असलेल्या कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे.

जन्म आणि मृत्यू या दोन्ही घटना प्रत्येक कुटुंबासाठी महत्त्वाच्या असतात. अशा वेळी कागदपत्रांमधील त्रुटींमुळे नागरिकांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागणे ही बाब योग्य नाही. रुग्णालयांनी आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडल्यास महानगरपालिका प्रशासनावरील अनावश्यक ताण कमी होईल आणि नागरिकांनाही वेळेत अचूक दाखले मिळू शकतील.

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने या प्रश्नाकडे केवळ कागदोपत्री बाब म्हणून न पाहता नागरिकांच्या अडचणींचा विचार करून ठोस उपाययोजना कराव्यात. रुग्णालयांकडून जन्म-मृत्यूची माहिती पाठविताना आवश्यक कागदपत्रांची पडताळणी, माहितीची अचूक नोंद आणि रुग्णालयनिहाय जबाबदारी निश्चित करावी. नागरिकांना चुकीच्या माहितीचा त्रास सहन करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने प्रभावी यंत्रणा उभी करावी, अशी मागणी प्रमोदकुमार छाजेड यांनी केली आहे.



INDIA'S ONE OF THE MOST PREMIUM FASHION EXHIBITION
Rangoli Exhibition
9 YEARS • 15 STATES • 95 CITIES | 70+ ELITE DESIGNER
WINTER & WEDDING SPECIAL
27 28 29
NOVEMBER • TIMING 11 AM - 9 PM
ELITE BANQUET
SANKET HOTEL, TILAK ROAD, SWASTIK CHOWK, AHILYANAGAR
GOLD COIN FOR LUCKY VISITORS
OPENS TODAY



FREE ENTRY | +91 9529902718, 7218157598
FASHION | DECOR | JEWELLERY | LUXURY | FOOTWEAR | REAL DIAMONDS | BRIDAL WEAR | BRIDAL JEWELLERY | ETHNICS | GOWNS | ACCESSORIES

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन - २४१४१४१, २४१९९९९, मो. ९२०९६६६६६६
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

अहिल्यानगरमध्ये २८ ते ३० नोव्हेंबरदरम्यान गजी नृत्य महोत्सवाचे आयोजन

नगर - महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या वतीने अहिल्यानगर येथे गजी नृत्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. २८ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत दररोज सायंकाळी ७ वाजता ऊर्जा भवन सभागृह, एकता कॉलनी, केडगाव रोड, अहिल्यानगर येथे हा महोत्सव विनामूल्य होणार आहे.

जागर लोककलेचा, वारसा संस्कृतीचा... या संकल्पनेवर आधारित या महोत्सवातून महाराष्ट्राच्या लोककला परंपरेतील गजी नृत्याचे सादरीकरण करण्यात येणार आहे. पारंपरिक लोकनृत्याच्या माध्यमातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणे आणि या कलाप्रकाराची ओळख अधिकाधिक रसिकांपर्यंत पोहोचविणे, हा या महोत्सवाचा उद्देश आहे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेत लोकनृत्यांना विशेष स्थान आहे. अशा पारंपरिक कलाप्रकारांचे जतन, संवर्धन आणि प्रसार व्हावा, लोककलावंतांना सादरीकरणासाठी व्यासपीठ उपलब्ध व्हावे तसेच नव्या पिढीला लोककलेच्या समृद्ध वारशाची ओळख व्हावी, या दृष्टीने सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. हा सांस्कृतिक उपक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात येत आहे. महोत्सवासाठी प्रवेश विनामूल्य असून, अहिल्यानगरमधील नागरिक, लोककलाप्रेमी आणि रसिकांनी पस्थित राहून गजी नृत्य महोत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक प्रशांत खेडेकर यांनी केले आहे.

अहिल्यानगरमध्ये १ डिसेंबरपासून फ्लेक्स, बॅनर, पोस्टर, झेंडा, कमान, कटआऊट व जाहिरात लावण्यास 'पूर्ण' बंदी

महानगरपालिकेकडून 'फ्लेक्स मुक्त अहिल्यानगर' विशेष अभियान

नगर - अहिल्यानगर महापालिकेच्या ४ नोव्हेंबर रोजी झालेल्या महासभेत झालेल्या चर्चेनुसार नगर शहर फ्लेक्स मुक्त करण्याचा निर्णय आयुक्तांनी घेतला आहे. त्यानुसार १ डिसेंबर पासून 'फ्लेक्स मुक्त अहिल्यानगर' म्हणून जाहीर करण्यात येत आहे. त्यानुसार महापालिका हद्दीतील कोणताही सार्वजनिक रस्ता, पदपथ, चौक, दुभाजक, विद्युत खांब, झाड, पूल, भिंत अथवा कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी तात्पुरते फ्लेक्स, बॅनर, पोस्टर, झेंडा, कमान, कट-आऊट अथवा जाहिरात लावण्यास पूर्ण बंदी राहील. वाढदिवस, शुभेच्छा, अभिनंदन, स्वागत, श्रद्धांजली, सण-उत्सव, धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम, जयंती-पुण्यतिथी, राजकीय-सामाजिक सभा अथवा व्यावसायिक जाहिरात यांपैकी कोणत्याही कारणासाठी तात्पुरत्या फ्लेक्स/बॅनरला परवानगी दिली जाणार नाही.

सार्वजनिक वा खाजगी मालमत्तेवर महानगरपालिकेच्या पूर्वलेखी परवानगीशिवाय कोणतेही होर्डिंग, बॅनर, फ्लेक्स, पोस्टर अथवा जाहिरात लावणे हा महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध अधिनियम, १९९५ चे कलम ३ अन्वये दंडनीय अपराध आहे (तीन महिन्यांपर्यंत कारावास किंवा रु. २,००० पर्यंत दंड अथवा दोन्ही). तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २४५ अन्वये कारवाईस पात्र आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. १५५/२०११ (सुस्वराज्य फाउंडेशन व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर) मध्ये ३१ जानेवारी २०१७ रोजीच्या निकालाद्वारे व त्यानंतरच्या आदेशांद्वारे सदर अधिनियमाची कठोर अंमलबजावणी करण्याचे आणि अनधिकृत फ्लेक्स/बॅनर उभारणाऱ्या व्यक्तींसह, ज्यांची नावे, छायाचित्रे वा पदनामे त्यावर प्रदर्शित आहेत, अशा व्यक्तींविरुद्धही फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. शहरात सध्या लावलेले सर्व तात्पुरते फ्लेक्स, बॅनर, पोस्टर व कमानी संबंधितांनी ३० नोव्हेंबर पर्यंत स्वखर्चाने काढून घ्याव्यात.

१ डिसेंबर २०२६ पासून शहरात कोणतेही फ्लेक्स, बॅनर, पोस्टर वा अनधिकृत होर्डिंग आढळून आल्यास, कोणतीही स्वतंत्र पूर्वसूचना न देता महानगरपालिकेमार्फत ते तत्काळ काढून जप्त करण्यात येईल व काढण्याचा संपूर्ण खर्च संबंधितांकडून वसूल करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध अधिनियम, १९९५ चे कलम ३, भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील संबंधित तरतुदी व उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार, (अ) फ्लेक्स/बॅनर उभारणारी वा उभारण्यास कारणीभूत ठरणारी व्यक्ती, (ब) ज्यांचे नाव, छायाचित्र वा पदनाम लाभार्थी म्हणून प्रदर्शित आहे अशी व्यक्ती, (क) संबंधित मुद्रक व जाहिरात संस्था आणि (ड) जाहिरात केलेल्या कार्यक्रमाचे आयोजक यांच्याविरुद्ध प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात येईल. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये दंड वसुलीसह दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

ज्या फ्लेक्स/बॅनरवर एखाद्या व्यक्तीचे नाव वा छायाचित्र प्रदर्शित आहे, ते फ्लेक्स/बॅनर त्या व्यक्तीच्या माहितीने व संमतीने उभारण्यात आले आहे, असे चौकशी व अभियोगाच्या प्रयोजनार्थ गृहीत धरण्यात येईल. मात्र, सदर प्रदर्शन निदर्शनास येताच संबंधित व्यक्तीने तत्काळ संबंधित प्रभाग समिती कार्यालयात लेखी अस्वीकृती व संबंधित पोलीस ठाण्यात सदर प्रदर्शन माझ्या संमतीशिवाय आहे अशी तक्रार दाखल केल्यास ही बाब विचारात घेण्यात येईल.

महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक ठिकाणी लावण्यासाठी कोणत्याही तात्पुरत्या फ्लेक्स/बॅनरची छपाई करू नये. प्रत्येक छापील फ्लेक्स, बॅनर वा पोस्टरवर मुद्रकाचे नाव, पत्ता व ज्यांच्या सांगण्यावरून छपाई केली त्या व्यक्तीचे नाव, पत्ता नमूद असणे बंधनकारक आहे. अनधिकृत प्रदर्शनासाठी छपाई करणाऱ्या मुद्रकांवर सहआरोपी म्हणून कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.असा इशारा देण्यात आला आहे.

महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण दोन दुचाकी स्वारांनी ओरबडून नेले

नगर - शहरातील वर्दळीच्या प्रोफेसर कॉलनी चौकात तोंडाला रुमाल बांधून आलेल्या दोन अज्ञात दुचाकीस्वार चोरट्यांनी एका ज्येष्ठ महिलेच्या गळ्यातील दोन लाख रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण बळजबरीने ओरबाडून नेल्याची धक्कादायक घटना २६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास घडली असून याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

एलआयसी कॉलनी परिसरातील शिंगवी ज्वेलर्समागे राहणाऱ्या अश्विनी शांताराम झावरे (वय ६०) या सायंकाळी प्रोफेसर कॉलनी चौकातील रेणुका माता मंदिराजवळील सान्वी ड्रायफ्रूट दुकानासमोरून जात असताना लाल आणि काळ्या रंगाच्या विना क्रमांकाच्या दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी त्यांना गाठले आणि काही कळायच्या आतच त्यांच्या गळ्यातील १८ ग्रॅम वजनाचे दोन लाख रुपये किमतीचे सोन्याचे मिनी गंठण हिसकावून घेत भरधाव वेगाने घटनास्थळावरून पळ काढला.

या घटनेची माहिती मिळताच नगर शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे, तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक बालाजी वैद्य, सहायक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण आणि स्थानिक गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक अनंत सालगुडे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. फिर्यादी अश्विनी झावरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून रात्री उशिरा अज्ञात चोरट्यांच्या विरुध्द भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(४), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास उपनिरीक्षक योगेश चाहेर हे करत आहेत.

बोल्हेगाव परिसरातून पल्सर दुचाकीची चोरी

नगर - बोल्हेगाव फाटा येथील गुरुकृपा कॉलनी, आदर्शनगर परिसरातून अज्ञात चोरट्याने बजाज पल्सर दुचाकी चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२५ नोव्हेंबर रोजी रात्री १० ते २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजण्याच्या दरम्यान ही चोरीची घटना घडली. चोरीस गेलेली गाडी काळ्या रंगाची 'पल्सर एनएस २००' (क्र.एमएच ३७ एएन ७४८६) असून याबाबत दीपक विजय गोळे (वय २५, रा. केनवड, ता. रिसोड, जि. वाशिम; सध्या रा. गुरुकृपा कॉलनी, आदर्शनगर, बोल्हेगाव फाटा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (ब) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

अंतिम मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत संधी

नगर - नगर शहरातील ज्या मतदारांचा विविध कारणांनी मतदारयादीत समावेश झालेला नाही. त्यांना अंतिम मतदार यादीत नाव समाविष्ट करण्याची ३० नोव्हेंबरपर्यंत आणखी एक संधी मिळणार आहे. यात अनुपस्थित स्थलांतरित व दुबार मतदारांचा समावेश आहे. यासाठी निवडणूक आयोगाने विशेष मोहीमेचे आयोजन केलेले आहे.

भारत निवडणूक आयोगाकडील मतदार यादीचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम (एसआयआर) २०२६ च्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रसिध्द झालेल्या प्रारूप मतदार यादीमध्ये समाविष्ट न झालेल्या अनुपस्थित स्थलांतरित / मयत / दुबार मतदारांना त्यांची नांवे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करणे करीता आणखी एक संधी देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार नगर शहर विधानसभा मतदार संघातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांना संबंधीत मतदारांसाठी गणना प्रपत्र (अर्ज) उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

संबंधीत मतदारांची संख्या ६८,८४६ वर

नगर शहर विधानसभा मतदार संघामध्ये संबंधीत मतदारांची संख्या ६८,८४६ आहे. त्यामध्ये गृहभेटी टप्पा कार्यक्रमाचे वेळी अनुपस्थित मतदार १७५३५, कायमस्वरुपी स्थलांतरीत असलेले मतदार २९,८५९, दुबार मतदार ६६७२, इतर कारणास्तव १०३ आणि मयत मतदार १४,६७७ आहेत. विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांचे गृहभेटी वेळी अनुपस्थित किंवा स्थलांतरीत असलेल्या मतदारांची गणनापत्र भरुन घेता आलेली नाहीत, अशा मतदारांचा सर्वसाधारण रहिवास संबंधित यादीभागात असल्यास संबंधित पात्र मतदारांनी आपले गणनापत्र ३० नोव्हेंबर २०२६ पूर्वी भरुन बीएलओ यांच्याकडे भरून देणे आवश्यक आहे, अशी माहिती मतदार नोंदणी अधिकारी सुधीर पाटील यांनी दिली.

२८ व २९ नोव्हेंबरला विशेष नोंदणी शिबीरे

नगर शहर विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदान केंद्रावर भागनिहाय वरील याद्या प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. तसेच अहिल्यानगर महानगरपालिका व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या एनआयसीच्या संकेतस्थळावर याद्या प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. वरील याद्यामधील पात्र मतदारांना आपली नावे अंतिम मतदार यादीत नोंदविण्याकरीता गणना पत्र दाखल करणे सुलभ व्हावे यासाठी सर्व मतदान केंद्रावर २८ व २९ नोव्हेंबर रोजी विशेष नोंदणी शिबीरे आयोजित करण्यात आली आहेत. तरी पात्र मतदारांनी आपले गणना पत्र मुदतीत भरुन देणेकरीता संबंधित बीएलओ यांचेशी संपर्क साधण्याचे आवाहन तसेच यासंदर्भात २६ नोव्हेंबर रोजी नोंदणीकृत राजकीय पक्षाचे प्रतिनिधींची बैठक घेऊन वरील पात्र मतदारांचे गणनापत्र भरुन घेणेकरीता बीएलए यांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.

नगर शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अतिक्रमण हटाव मोहीम व्यापक

टिळक रोड, आयुर्वेदीक कॉर्नर, वाडिया पार्क, सक्कर चौक, बालिकाश्रम रोड, कोठी आदी परिसरात कारवाई

नगर- अहिल्यानगर महानगरपालिकेने शहरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आणि रस्ते मोकळे करण्यासाठी नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात व्यापक अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली आहे. महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या आदेशानुसार आणि अतिक्रमण विभागप्रमुख सुरेश इथापे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई वेगाने सुरू आहे.

नगर शहरातील मुख्य रस्ते आणि पदपथांवरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी २५ नोव्हेंबरपासून अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली आहे. शहरातील अत्यंत वर्दळीच्या नवीन टिळक रस्त्यावर आणि सक्कर चौक परिसरात जेसीबीच्या साहाय्याने पक्की अतिक्रमणे, अनधिकृत टपऱ्या आणि पत्र्याचे शेड जमीनदोस्त करण्यात आले. बालिकाश्रम रोड रस्त्यालगत असलेली पक्की बांधकामे, ओटे आणि अतिक्रमणे जेसीबीच्या साहाय्याने जमीनदोस्त करण्यात आली आहेत.





जुन्या महापालिका कार्यालयापासून ते आयुर्वेद कॉर्नर या मार्गावर वाडिया पार्क परिसर, सक्कर चौक आणि कोठी परिसरातील फुटपाथवरील टपऱ्या व अनधिकृत फलक हटवण्यात आले आहेत. जुन्या महानगरपालिका कार्यालयापासून कारवाईची सुरुवात होऊन वाडिया पार्क, आयुर्वेद कॉर्नर आणि कोठी परिसरातील फुटपाथवरील अडथळे दूर करण्यात आले. बालिकाश्रम रोडसह प्रभाग क्रमांक २, ३ आणि ४ मधील भाऊसाहेब फिरोदिया शाळेच्या कंपाउंडलगत असणाऱ्या हातगाड्या, नाष्ट्याचे स्टॉल आणि रस विक्रेत्यांवर कारवाई करून साहित्य जप्त करण्यात आले. नवीन टिळक रस्त्यासह शहरातील विविध भागांमध्ये अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली.

वाहतुकीस अडथळा ठरणारी अनधिकृत अतिक्रमणे हटवून नागरिकांना सुरक्षित आणि मोकळे रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेने ही कारवाई केली आहे. स्वच्छ, सुंदर आणि अतिक्रमणमुक्त अहिल्यानगरसाठी महापालिका कटिबद्ध असल्याचे प्रशासनाने म्हटले आहे. आयुक्तांनी नागरिक व व्यावसायिकांना आपली अतिक्रमणे स्वतःहून काढून घेण्याचे आवाहन केले आहे, अन्यथा दंडात्मक आणि कायदेशीर कारवाईचा इशारा दिला आहे. शहराचे रस्ते मोकळे ठेवण्यासाठी ही मोहीम यापुढेही नियमितपणे सुरू राहणार असल्याचे अतिक्रमण विभागप्रमुख सुरेश इथापे यांनी स्पष्ट केले आहे.

प्रकाशलाल पोखरणा यांचे हृदयविकाराने निधन



नगर - गणेश चौक, सिव्हील हडको येथील रहिवासी प्रकाशलाल तखमल पोखरणा (अळकुटीवाला) (वय ६४) यांचे २७ नोव्हेंबर रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अमित पोखरणा यांचे ते वडील होत.

अशोक मूळे यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर - येथील रहिवासी अशोक सीताराम मुळे (वय ८६) यांचे २४ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी वृद्धापकाळाने नाशिक येथे निधन झाले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ट्रेझरी, कलेक्टर कचेरी अशा शासकीय विभागात त्यांनी नोकरी केली. ते एचडीएफसी बँकेचे पुणे येथील झोनल हेड निलेश मुळे यांचे वडील होत.

चंद्रकांत महाबळ यांचे दु:खद निधन



नगर - आनंद बंगलो, मयुरेश कॉलनी, सहकारनगर, सावेडी येथील रहिवासी, सेवानिवृत्त शिक्षक चंद्रकांत रामचंद्र महाबळ (वय ८२) यांचे नुकतेच दु:खद निधन झाले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मलाबार गोल्ड आणि डायमंड्सचे शाखा व्यवस्थापक देवेंद्र महाबळ यांचे ते वडील होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

घरासमोरून बुलेटची चोरी

नगर - देऊळगाव सिद्धी येथील घरा समोरुन बुलेट दुचाकीची चोरी झाली. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० ते १० वाजण्याच्या दरम्यान फिर्यादीच्या घराच्या गेटसमोरून काळ्या रंगाची 'रॉयल एनफिल्ड क्लासिक ३५०' सीसी इंजिनची बुलेट गाडी (क्र. एमएच १६ एबी १६९१) चोरीस गेली. या प्रकरणी परसराम आंबादास जगधने (वय ४१, रा. देऊळगाव सिद्धी, ता.नगर) यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मतदारसंघांच्या पुनर्रचनेशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयकाला मंत्रिमंडळाची मंजुरी

विविध राज्यांमधील जागांची संख्या ५० टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय

नवी दिल्ली- मतदारसंघ पुनर्रचना आणि महिला आरक्षणाशी संबंधित घटनादुरुस्ती विधेयकातील दुरुस्त्यांना कॅबिनेटमध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. यामध्ये विविध राज्यांमधील जागांची संख्या ५० टक्क्यांनी वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यांमध्ये जागांच्या वाटपाची सध्याची व्यवस्था पुढील २५ वर्षांपर्यंत म्हणजेच २०५१ सालापर्यंत कायम राहील. याच पार्श्वभूमीवरती केंद्र सरकार आणत असलेल्या डिलिमिटेशन बिलाला पाठींबा मिळावा यासाठी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यासोबत भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांचा संपर्क केला. पुढील काही दिवसांत हे बिल आणले जात आहे, त्यावेळेस सर्व सहकार्य मिळावे यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाच्या नेत्यांसोबत संवाद करून शंका दूर करण्यात येणार असल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे.

पुढील आठवड्यात संसदेचे विशेष अधिवेशन

केंद्र सरकारने पुढील आठवड्यात संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. सरकार महत्त्वाचे विधेयक आणणार असल्याची माहिती संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू यांनी दिली आहे. त्यामुळे लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेचा मुद्दा चर्चेत आला आहे. लोकसभेच्या मतदारसंघ पुनर्रचनेसाठी विशेष बहुमताने विधेयक मंजूर करावे लागेल. विधेयक मंजूर झाल्यास लोकसभा मतदारसंघांची संख्या ८५० वर जाईल. लोकसभेत दोन तृतीयांश आमदारांचा पाठिंबा मिळाल्यावरच विधेयक मंजूर होईल. यासाठी भाजप प्रणित एनडीएला अनेक पक्षांची मदत लागणार आहे. संसदेचे आगामी विशेष सत्र ३० नोव्हेंबर पासून ३ डिसेंबर पर्यंत आयोजित करण्यात आले आहे. यात लोकसभेचे कामकाज ३० नोव्हेंबर तर राज्यसभेचे कामकाज २ डिसेंबरपासून सुरु होईल. सरकारी कामकाजाच्या गरजेनुसार दोन्ही सभागृहांच्या बैठका ३ डिसेंबरपर्यंत चालण्याची शक्यता आहे. हे स्वतंत्र हिवाळी अधिवेशन नसून ऑगस्टमध्ये संस्थगित केलेल्या पावसाळी अधिवेशनाचाच पुढील भाग (विस्तार) म्हणून बोलावण्यात आले आहे. नियमित हिवाळी अधिवेशनाच्या स्वतंत्र तारखा अद्याप अधिकृतपणे जाहीर झालेल्या नाहीत.

महिला आरक्षणाला पाठिंबा; मात्र संसद सदस्यसंख्या वाढविण्यास विरोध!

पेन्शन आणि सुविधांचा आर्थिक भार जनतेवर कशासाठी?; संसद विस्ताराआधी कामकाजाचा हिशेब द्या

नगर - महिला आरक्षणाला पूर्ण पाठिंबा असला, तरी संसद सदस्यसंख्या वाढविण्याच्या प्रस्तावाला पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेने विरोध दर्शविला आहे. संसदेतील निष्क्रिय कामकाज, वाढत्या सुविधा आणि पेन्शनवरील खर्चाचा अतिरिक्त आर्थिक भार जनतेवर टाकू नये, अशी भूमिका घेत दोन्ही संघटनांनी या प्रस्तावाविरोधात आंदोलनाची घोषणा केली आहे. महिलांना संसदेत आरक्षण मिळालेच पाहिजे; मात्र त्यासाठी संसद सदस्यसंख्या वाढवून जनतेवर अतिरिक्त आर्थिक भार टाकण्याची आवश्यकता नाही, अशी भूमिका ज्येष्ठ विधितज्ज्ञ ॲड. कारभारी गवळी यांनी मांडली.

संघटनांनी उपस्थित केलेल्या भूमिकेनुसार, जनतेच्या पैशातून चालणारी संसद जनतेच्या प्रश्नांवर किती प्रभावीपणे काम करते, याचा आधी हिशेब दिला पाहिजे. संसदेचे कामकाज वर्षानुवर्षे निष्प्रभ राहणार आणि त्याचवेळी सदस्यसंख्या, सुविधा व पेन्शनवरील खर्चही वाढणार, ही लोकशाहीची सेवा नव्हे, असा सवाल संघटनांनी उपस्थित केला आहे. संसदेमधील चर्चेची गुणवत्ता, कामकाजाचे दिवस, जनतेप्रती उत्तरदायित्व आणि सार्वजनिक निधीचा विनियोग यांचे मूल्यमापन झाल्याशिवाय सदस्यसंख्या वाढविण्याचा निर्णय घेऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

महिला आरक्षण हा समान प्रतिनिधित्वाचा आणि लोकशाहीचा महत्त्वाचा प्रश्न आहे. त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे झालीच पाहिजे. मात्र, महिला आरक्षणाच्या नावाखाली संसदेचा विस्तार आणि जनतेवरील आर्थिक भार अपरिहार्य असल्याचे गृहीत धरू नये, असे संघटनांनी स्पष्ट केले आहे. प्रतिनिधित्व वाढविण्याचे पर्याय पारदर्शकपणे तपासले जावेत. त्याचबरोबर संसदीय कामकाजाची जबाबदारीही निश्चित करण्यात यावी, अशी भूमिका संघटनांनी घेतली आहे.

संघटनांच्या मते, भारतीय संसद ही केवळ सत्तेची केंद्रीकृत रचना न राहता राष्ट्रीय तिरंगा धारणालयाची गंगोत्री बनली पाहिजे. येथे लोकभक्ती, ज्ञानभक्ती, कर्मभक्ती, घटनात्मक नैतिकता आणि रिकॉन्शिओ शासनतत्त्व यांना सर्वोच्च स्थान मिळाले पाहिजे. राष्ट्रनिर्मितीचे ज्ञान संसदेत एकत्रित होऊन त्याचे रूपांतर लोककल्याणकारी निर्णयांमध्ये झाले पाहिजे. स्वातंत्र्य मिळाले; आता लोकशाहीला सामूहिक विवेक, उत्तरदायित्व आणि जनहिताच्या कृतीतून अर्थपूर्ण बनविण्याची वेळ आली आहे, असे संघटनांचे प्रतिपादन आहे.

भारत हे संपत्ती, सत्ता आणि प्रतिष्ठेच्या केंद्राभिमुख स्पर्धेचे राष्ट्र बनू नये. त्याऐवजी तिरंगा, संविधान आणि लोककल्याणाच्या मूल्यांवर उभे राहिलेले राष्ट्रधारणालय बनावे, असे आवाहन पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेने केले आहे. संसद विस्ताराच्या प्रस्तावावर निर्णय घेण्यापूर्वी त्यासाठी होणारा खर्च, पेन्शनवरील परिणाम, प्रतिनिधित्वाची पद्धत आणि संसदेच्या कामगिरीशी त्याचा असलेला संबंध यांचा स्पष्ट हिशेब जनतेसमोर मांडण्यात यावा, असे ॲड. गवळी यांनी म्हटले आहे.

या आंदोलनासाठी ॲड. गवळी, अशोक सब्बन, प्रकाश थोरात, ॲड. अमित थोरात, शाहीर कान्हू सुंबे, राहुल आढाव, बाळासाहेब पालवे, आनंद आढाव, अशोक भोसले, पोपट भोसले, वीर बहादुर प्रजापती, अभिमान शिंदे, बाबासाहेब भोसले आदी प्रयत्नशील आहेत.

गृहिणी

आरोग्य

लठ्ठपणावर उपाय

आजच्या धावपळीच्या आणि आधुनिक जीवनशैलीत लठ्ठपणा ही एक गंभीर आरोग्य समस्या बनली आहे. शरीरातील चरबीचे प्रमाण अवाजवी वाढल्यामुळे वजन प्रमाणाबाहेर वाढते, ज्याला आपण लठ्ठपणा म्हणतो. यामागे प्रामुख्याने आपली बदललेली जीवनशैली आणि खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी कारणीभूत आहेत. फास्ट फूड, तेलकट, तुपकट, अतिगोड पदार्थ आणि प्रक्रिया केलेल्या अन्नाचे (जंक फूड) अतिसेवन केल्यामुळे शरीरात अतिरिक्त कॅलरीज साठत जातात. त्याचप्रमाणे शारीरिक हालचालींचा अभाव, तासनतास एकाच जागी बसून काम करणे, व्यायामाचा कंटाळा करणे यामुळे खाल्लेल्या अन्नाचे रूपांतर ऊर्जेत न होता चरबीमध्ये होते. लठ्ठपणावर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि निरोगी राहण्यासाठी आहार व विहारात योग्य बदल करणे अत्यंत आवश्यक आहे. सर्वप्रथम आपल्या आहारातून साखर, मैदा, तळलेले पदार्थ आणि शीतपेये पूर्णपणे कमी करून त्याऐवजी पालेभाज्या, ताजी फळे, मोड आलेली कडधान्ये आणि प्रथिनेयुक्त (प्रोटीन) आहाराचा समावेश करावा. एकाच वेळी पोटभर जेवण्यापेक्षा थोड्या-थोड्या वेळाने आणि मर्यादित प्रमाणात खाण्याची सवय लावावी, तसेच रात्रीचे जेवण झोपण्यापूर्वी किमान दोन ते तीन तास आधी घ्यावे. दिवसभरात भरपूर पाणी पिणे शरीरातील चयापचय क्रिया (मेटाबॉलिझम) सुधारण्यास मदत करते. आहारासोबतच दररोज किमान ३० ते ४५ मिनिटे नियमित व्यायाम करणे गरजेचे आहे; यामध्ये वेगाने चालणे, धावणे, सायकल चालवणे, पोहणे किंवा योगासने व सूर्यनमस्कार यांचा समावेश करता येईल.

पाककला

चटपटीत मसाला पॉपकॉर्न

साहित्य : पॉपकॉर्नचे मक्याचे दाणे १/२ कप, तेल किंवा बटर २ मोठे चमचे, हळद १/४ छोटा चमचा, लाल तिखट १/२ छोटा चमचा, चाट मसाला १ छोटा चमचा, काळं मीठ किंवा साधं मीठ चवीनुसार, आमचूर पावडर किंवा मॅगी मसाला १/२ छोटा चमचा.

कृती : एका जाड बुडाची कढई किंवा कुकर मध्यम आचेवर गरम करून त्यात तेल किंवा बटर टाका. तेल हलके गरम झाल्यावर गॅस मंद करून त्यात हळद, लाल तिखट आणि मीठ घालून पटकन मिक्स करा. लगेच मक्याचे दाणे टाकून ३० सेकंद परतून घ्या. दाणे फुटायला लागल्यावर गॅस मध्यम करून कढई किंवा कुकरवर घट्ट झाकण ठेवा (कुकरची शिट्टी व रिंग काढून ठेवा). दाणे फुटण्याचा आवाज येऊ लागल्यावर कढई किंवा कुकर झाकणासकट अधूनमधून हलवत राहा. २ ते ३ मिनिटांत आवाज बंद झाल्यावर गॅस बंद करून झाकण उघडा. गरमागरम पॉपकॉर्न एका बाऊलमध्ये काढून त्यावर चाट मसाला, काळं मीठ आणि आमचूर पावडर भुरभुरवून नीट मिक्स करा व सर्व्ह करा. (टीप : खास पॉपकॉर्न मेझ दाणेच वापरावेत.)

वास्तू

बाथरूम संबंधी

* बाथरूममध्ये सुगंधी साबण किंवा फिनाईल वापरावा.
* टॉयलेटमध्ये एक्झॉस्ट फॅन पूर्वेला लावावा.
* बाथरूमच्या दरवाजावर कधीही देवाचा फोटो लावू नये.
* बाथरूममध्ये पाण्याची टाकी दक्षिणेला ठेवू नये.

सौंदर्य

* चेहऱ्यावर जास्त साबण वापरू नये, कडधान्याचे पीठ वापरावे. * तिळाचे तेल शरीराला लावल्याने त्वचा चमकदार राहते.

सल्ला

* लसूण लवकर सोलायचा असेल तर पाकळ्या १० मिनिटे गरम पाण्यात भिजवा.
* पुदिना काळा पडू नये म्हणून पाण्यात देठ बुडवून ठेवा.

संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

दैनिक पंचांग

शनिवार, दि. २८ नोव्हेंबर २०२६

---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, कार्तिक कृष्णपक्ष, पुनर्वसु १२।५०, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३१ मि.

राशिभविष्य

मेष : घराचे प्रश्न सुटतील. मानसिक प्रसन्नता राहील.

वृषभ : कर्तृत्वाला संधी मिळेल. आध्यात्मिक प्रगती.

मिथुन : जुने पैसे परत मिळतील. दिवस चांगला.

कर्क : कामे पूर्ण होतील. आरोग्य सुधारेल.

सिंह : कामे थोडी रखडतील. शांत राहा.

कन्या : सर्वांचे सहकार्य मिळेल. निर्णय यशस्वी.

तूळ : आत्मविश्वास वाढेल. प्रभाव पडेल.

वृश्चिक : कामात यश. मन समाधानी राहील.

धनू : खर्च वाढेल. उधारी देऊ नका.

मकर : वैवाहिक जीवनात गोडवा. निर्णय अचूक.

कुंभ : खर्चावर नियंत्रण ठेवा. वस्तू सांभाळा.

मीन : व्यवसायात फायदा. प्रवासाचे योग.

शब्दगंध क्र. ७५६४ सौ.शैलजा कुलकर्णी



आडवे शब्द :- १) तर्क; अनुमान; अटकळ; कयास ४) निलाजरा; निर्लज्ज; एक वनस्पती; शरम नसलेला ७) जीवित; आयुष्य; उमर; पाणी; जल ८) एक पक्षी; भारद्वाज ९) एक दिवंगत भारतीय क्रिकेटपटू ज्यांच्या नावाने भारतात क्रिकेट स्पर्धा होत असतात १०) अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था (संक्षिप्त नाव) १२) पृथ्वी; धरती; रसा १६) आकाश; गगन; अंबर १७) युग; हंगाम १९) घोडा; अश्व; वारू २०) वृद्धी; वाढ; प्रगती २१) कारागिराचे हत्यार २३) सकळ; सर्व; सारे २४) एक लष्करी वहन ज्याला इंग्रजीत टँक म्हणतात

उभे शब्द :- १) एक फळ २) जिला अनेक जनावरे बांधली जातात ती लांबलचक एकच दोरी ३) लोकांचे रोजचे जगणे किंवा रहाटगाडगे ४) सावध नसलेला ५) बाण; तीर ६) जीभ; वाणी; एक पेय ११) समोरासमोरची लढाई १३) हा जळतो पण पीळ जळत नाही १४) राज्यासंबंधीचे प्रश्न किंवा गुप्त मसलत १५) एका ठिकाणी बसणे उठणे १८) महिना; माह २०) पुरुषांचे एक वस्त्र; पायजमा; तुमान २१) शेवट; अंत; अखेर २२) विविध पदार्थांचे मिश्रण घालून तयार केलेली नागवेलीच्या पानांची पुडी; तांबूल

शब्दगंध क्र. ७५६३ चे उत्तर



फिल्मीचक्कर क्र. १२६३ चे उत्तर



* * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

सुविचार : कष्टाशिवाय मिळालेले सुख फार काळ टिकत नाही.

मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

बर्मुडा ट्रँगलमध्ये जहाजे गायब कशी होतात?

नमस्कार चिमुकल्या मित्रांनो! कसे आहात सगळे? आजच्या आपल्या खास विज्ञान सदरात आपण एका अशा जागेची गोष्ट ऐकणार आहोत, जिचे नाव ऐकताच मोठी माणसेही डोळे मोठे करून विचार करतात, 'अरेच्चा, या जागेत नक्की काय चालतं?' ती रहस्यमयी जागा म्हणजे अटलांटिक महासागरातील बरम्युडा बेट, अमेरिकेतील फ्लोरिडा आणि प्युर्टो रिको यांना जोडणारा महाकाय त्रिकोणी पट्टा, ज्याला सगळे 'बरम्युडा ट्रँगल' म्हणतात. या जागेचे नाव निघाले की काहींना वाटते की तिथे पाण्याखाली एखादा मोठा चुंबक दडला आहे, काहींना वाटते की तिथे भूतबाधा आहे, तर काही खट्याळ कल्पना करणाऱ्यांना वाटते की परग्रहावरील एलियन्सची उडती तबकडी तिथे येऊन लपते आणि जहाजांना किंवा विमानांना उचलून नेते! पण मित्रांनो, या सगळ्या गोष्टी एखाद्या छानशा कॉमिक्ससारख्या वाटल्या तरी प्रत्यक्षात तिथे कोणतीही जादू, भूत किंवा परग्रहावरील पाहुणे नाहीत; उलट तिथे चालतो तो खुद्द निसर्गाचा आणि समुद्राचा एक मोठा आणि गमतीशीर लपंडाव, ज्यामागचे विज्ञान समजून घेतल्यावर सगळी भीती पळून जाते आणि फक्त मज्जाच उरते!

या महासागराच्या पाण्याखाली कधीकधी अचानक एखादी अवाढव्य आणि प्रचंड ताकदवान लाट तयार होते, जिला शास्त्रज्ञ 'रोग वेव्ह' म्हणतात; ही लाट एखाद्या उत्तुंग इमारतीसारखी उंच उसळते आणि इतर लाटांपेक्षा वेगळी असते, त्यामुळे समोर येणाऱ्या मोठ्या जहाजाला ती क्षणात आपल्या कवेत घेऊन हलवू किंवा बुडवू शकते. दुसरी गम्मत अशी की, समुद्राच्या तळाशी साठलेला मिथेन वायू कधीकधी मोठ्या बुडबुड्यांच्या रूपात पाण्यातून वर उसळतो आणि पाण्यातील हा बुडबुड्यांचा खळबळाट इतका जोरदार असतो की पाण्याची पकड कमी होते आणि तरंगणाऱ्या जहाजाला खालून नीट आधार न मिळाल्यामुळे ते पाण्यात खाली ओढले जाऊ शकते. याशिवाय या भागात समुद्राचे गरम प्रवाह वाहतात आणि हवामान तर एखाद्या चिडलेल्या मित्रासारखे काही मिनिटांतच बदलते; कधी शांत आणि निळे दिसणारे आकाश अचानक काळ्या ढगांनी भरून जाते, जोरदार वारे वाहतात आणि वादळे सुरू होतात, ज्यामुळे प्रवास करणाऱ्यांना मार्ग ओळखणे आणि दिशा समजणे खूप अवघड होते. काही वेळा होकायंत्राचा (कंपासचा) काटाही थोडासा गोंधळल्यासारखा वाटतो किंवा चुंबकीय प्रभावामुळे दिशाभूल होण्याची शक्यता निर्माण होते, त्यामुळे जुन्या काळात आजच्यासारखी आधुनिक साधने नसताना वाट चुकण्याचे आणि अपघातांचे प्रकार जास्त घडले असावेत. आज मात्र आपल्याकडे अत्याधुनिक उपग्रह, रडार, जीपीएस आणि अचूक हवामान सांगणारी यंत्रणा आहे, त्यामुळे या त्रिकोणातून दररोज शेकडो-हजारो जहाजे आणि विमाने अगदी आरामात आणि सुरक्षितपणे ये-जा करतात. थोडक्यात सांगायचे तर, बरम्युडा ट्रँगल म्हणजे कोणतेही भयानक भूत किंवा अद्भुत जादू नसून समुद्राच्या लाटा, वायू आणि बदलत्या हवामानाच्या खोड्यांची एक रंजक आणि शिकण्यासारखी विज्ञानकथा आहे, जी जाणून घेण्यातच खरा आनंद आहे!

अप्रामाणिकपणाची फळ

एका गावात रामराव नावाचा एक गरीब पण अत्यंत प्रामाणिक शेतकरी राहत होता. त्याच्याकडे स्वतःची छोटीशी जमीन होती आणि तो कष्ट करून आपला उदरनिर्वाह चालवत असे. एकदा शेतात काम करताना त्याला जमिनीत पुरलेली सोन्याची एक मोठी पेटी सापडली. पेटी उघडताच आत लखलखणारी सोन्याची नाणी आणि दागिने दिसले.

इतर कोणी असते तर ती पेटी लगेच घरी घेऊन गेले असते; पण रामरावाने तसे केले नाही. त्याने विचार केला की, ही संपत्ती नक्कीच कोणाची तरी हरवलेली किंवा ठेवलेली आहे. कष्टाशिवाय मिळालेली गोष्ट आपली असू शकत नाही. त्याने ती पेटी गावातील सरपंचाकडे नेऊन दिली आणि घडलेला सर्व प्रकार सांगितला.

सरपंचाने गावात दवंडी पिटवली की रामरावला सापडलेली सोन्याची पेटी ज्याची असेल, त्याने पुरावे देऊन ती घेऊन जावी. दुसऱ्याच दिवशी गावातील एक धनवान सावकार पुढे आला. त्याने पेटीत काय आहे हे अचूक सांगितले आणि पेटी आपली असल्याचे कबूल केले.

मात्र, पेटी परत मिळाल्यावर त्याने रामरावला बक्षीस देण्याऐवजी खोटा आरोप केला की, पेटीत आणखी एक मोठी सोन्याची माळ होती, ती या शेतकऱ्याने काढून घेतली आहे.

हा वाद न्यायनिवाड्यासाठी गावातील पंचांसमोर गेला. सावकाराने खोटे बोलून रामरावाला अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. पण पंचांनी शांतपणे चौकशी केली. पेटीवरची धूळ आणि ती ठेवण्याची जागा पाहून पंचांना लक्षात आले की ती पेटी अनेक वर्षे तशीच पडून होती आणि ती उघडल्याचे कोणतेही खुण नव्हते. शिवाय, रामरावाचा आजवरचा प्रामाणिकपणा सर्व गावाला माहीत होता. अखेर पंचांनी सावकाराचा खोटारडेपणा उघड केला आणि त्याला दंड ठोठावला. रामरावाच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक झाले आणि सावकारानेही स्वतःची चूक मान्य करून रामरावाची माफी मागितली.

तात्पर्य : प्रामाणिकपणा हाच खरा दागिना आहे. खोटेपणा किंवा अप्रामाणिकपणा कितीही लपवण्याचा प्रयत्न केला, तरी एके दिवशी सत्य समोर येतेच.

आत्मशक्ति



होत जातो. शारीरिक व मानसिक दुःखांनी पीडलेला असा तो नेहमी कष्टांच्या भोवऱ्यात अडकून राहतो. हेच मला सांगायचे आहे. (अकारांगसूत्र २-६०, ७४)बायबलच्या नव्या करारात सांगितले आहे, धनाचा लोभ सर्व पापांचे मूळ आहे. (तीमुथियुस ६-१०) लोभी प्रवृत्ती आत्म्याच्या सहजप्रवृत्तीच्या विरुध्द आहे.

आत्म्याला वाटते की सारी सुखे पुण्य विश्वात वाटावीत. जे चांगले असेल ते आपल्या एकट्या जवळच ना सर्वांना त्याचा लाभ व्हावा असे त्याला वाटते.आपल्याजवळ जे काही आहे त्यात आत्मा संतुष्ट असतो. तसा तो का नाही ? असणारच कारण परमेश्वराशी एकरूपता ही त्याची सहज प्रवृत्ती असते. स्वतः स्वयंपूर्ण आहे. तो नेहमीच दिव्य

अध्यात्मिक शक्ती

आनंद आणि प्रसन्न स्थितीत राहतो. या जगातील क्षणभंगुर खेळणी नष्ट होणाऱ्या असतात. त्यांच्याकडे तो आकर्षित होत नाही. क्षणिक सुखवस्तू त्याला आकर्षक वाटत नाहीत. परमात्मा आनंद, चैतन्य व प्रेमाचा चिरस्थायी महासागरच आहे. परमात्माच आत्म्याच्या प्रसन्नतेचे स्रोत (मूळस्थान) आहे.

जेव्हा आपण आपल्या आत्म्याची ओळख करून घेतो तेव्हा लोभाच्या बंधनातून आपली सुटका होते. आम्ही समाधान पावतो; आणि आत्मामृताचे पान करतो. आम्हाला दुसऱ्याची संपत्ती बळकावण्याची इच्छा होत नाही. काही मिळवण्यासाठी आम्हाला हिंसेचा व धोकेबाजीचा मार्ग स्विकारावा लागत नाही. जेव्हा आम्हाला अंतरीय शांति मिळते, तेव्हा बाह्य आनंद नीरस होऊन जातात. आमच्या निर्मळ आत्म्यावर लोभ आपली छाप टाकतो. आम्ही आमच्या मनावर ताबा मिळवून आत्म्याला जागृत केले तर अमर्याद इच्छांच्या चक्राचा नाश करु शकतो. तेव्हा आम्ही आमच्या भाग्यावर खुश होऊ शकू. आपले ध्येय गाठून समाधानी होऊ शकू. शांत अवस्थेत राहून परमेश्वराकडून मिळणाऱ्या प्रत्येक वस्तूचा प्रेमाने स्वीकार करु शकू. अशा रितीने आम्ही आम्हाला जाळू पाहणाऱ्या लोभाच्या अग्नीला शांत करु शकतो. आत्मा जागृत झाल्यावर लोभाची धगधग आमच्यापर्यंत येतच नाही. आमचा बहुमोल वेळ, नाशवंत वस्तूंचा शोध घेण्यात आम्ही व्यर्थ घालवत नाही. उलट स्थायी स्वरूपाच्या टिकाऊ अशा आत्मिक खजिन्यांचा लाभ घेत पूर्णतः समाधानी होतो.

(क्रमशः)

(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)

चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

तो सल्ला आपल्यासाठी प्रभावी आहे की नाही, त्याच्यावर अंमलबजावणी करण्याची आपल्यात क्षमता आहे की नाही हे आपल्यालाच पाहावं लागेल. तेव्हा ते कर्म आपलं असेल, त्या निर्णयाची आणि त्याच्या परिणामांची जबाबदारी आपली असेल. आणि मग जे काही होईल त्याला आपण सामोरं जाऊ शकू कारण तो निर्णय आपला होता. याउलट, जर इतर कोणी आपल्यासाठी निर्णय घेतला आणि तो चुकला तर त्या व्यक्तीला दोष देण्याची आपली प्रवृत्ती बनेल. ज्या क्षणी आपण दोषारोपांमध्ये अडकतो त्या क्षणी आपली आध्यात्मिक शक्ती कमी होते.ध्यान आणि चिंतनआरामात बसा... मी, आत्मा, इतर आत्म्यांबरोबर असलेली माझी भूमिका निभावण्यासाठी या जगात आलो आहे... वेगवेगळ्या नात्यांनी जोडल्या गेलेल्या सगळ्या आत्म्यांना मी

नाती घट्ट विणू या

पूर्वी भेटलो आहे... जेव्हा आमची पहिली भेट झाली होती तेव्हा एक खातं चालू झालं होतं... भलेही आम्ही आमचे शरीररूपी पोशाख बदलले तरीसुद्धा ते खातं अजूनही चालूच आहे... ते सगळे आत्मे माझ्या आजूबाजूला वेगवेगळ्या भूमिकांमध्ये आणि नात्यांमध्ये उपस्थित आहेत... जे काही घडत आहे ते अगदी न्याय्य आणि अचूक आहे... माझं मन कधीच त्यांना हे मनातील अनेक प्रश्नांची उत्तरं आपल्याला मिळतात. स्वतःला बरं करणं आणि वास्तवाचा स्वीकार करणं सोपं होतं.

सुरेश ओबेरॉय :

हे सगळं खूपच चित्तवेधक आहे. ही माहिती जर समजून घेतली तर प्रेमस्वरूप बनणं खूप सोपं होईल.

शिवानीदीदी :

हो. जेव्हा आपल्याला आध्यात्मिक सत्यं समजतात तेव्हा आपली प्रेमाची ऊर्जा 'माझ्या बरोबर असं का होतं आहे' किंवा 'घरातलाच असूनही हा माझ्याशी असं का वागतो' अशा प्रश्नांमुळे रोखली जाणार नाही. आता आपल्याला हे माहीत आहे की कोणतंही नातं हे प्रत्यक्षात दोन आत्म्यांमधला संबंध आहे.

सुरेश ओबेरॉय : गोष्टी आता खूप स्पष्ट झाल्या आहेत.ध्यान आणि चिंतनमी, एका आत्म्याच्या रूपात प्रदीर्घ प्रवासावर आहे... मी अनेक पोशाख धारण केले आहेत,

(क्रमशः)

(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)

हसा आणि शतायुषी व्हा!

रुग्ण : डॉक्टर, मला झोपेत चालायची सवय आहे, काय करू?
डॉक्टर : अहो, मग घराची खिडकी उघडी ठेवून झोपा.
रुग्ण : का हो?
डॉक्टर : झोपेत चालता-चालता बाहेर पडलात, तर निदान ताजी हवा तरी मिळेल!

करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* जगातील सर्वात मोठा देश कोणता?

- रशिया

- अरविंद ब्राम्हणे, भिंगार मो. ९४०३७३४२८१

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

दुःखे संपुर्ण अति दुःखी ।।३३।।ते कालची त्याची व्यथा ।

नेणती ते माता पिता । तेथे नाही म्हणता । आपली दुःखिता आपण भोगी ।।३४।।(भावार्थ रामायण - अध्याय नववा)म्हणून सहसा मातेने अती कडू, अती आंबट व अती खारट पदार्थ खाऊ नये. आधुनिकशास्त्रानुसार आईचा आहार कार्बोहायड्रेटस्, प्रोटीन्स, व्हिटॅमिन्स, मिनरल्स, फॅट्स,वंध्यत्वाची तपासणी करण्यासाठी डॉक्टरांकडे पती-पत्नी असे दोघांनीही जाऊन डॉक्टरांना वंध्यत्वाचे निदान करण्यास साहाय्य करावे.

आयुर्वेदिक गर्भसंस्कार

कारण पती-पत्नी दोघेही तपासणीस आले, तर वंध्यत्वाचे कारण लगेचच समजू शकते. वंध्यत्वाच्या कारणांचा शोध घेण्यासाठी व उपचार निश्चिती करण्यासाठी डॉक्टरांना दोघांचीही शारीरिक तपासणी करणे गरजेचे असते.

शारीरिक तपासणीनंतर दांपत्याला विश्वासात घेऊन त्यांना लैंगिक शारीरिक संबंधामध्ये काही अडचण आहे का याची विचारपूस करावी लागते. तसेच पतीला काही व्यसन आहे का?

असेल तर व्यसन सोडून देण्यास सांगितले जाते. त्यानंतर रक्तगट, रक्ताचे प्रमाण, रक्तातील साखरेचे प्रमाण, गुप्तरोग, अशा दोघांच्याही प्राथमिक तपासण्या कराव्या लागतात.

लघवी तपासणी :यामध्ये जंतूसंसर्ग आहे का तसेच मधुमेह आहे का याचे निदान करता येते.

वीर्य तपासणी :वीर्यामध्ये शुक्रजंतूंचे प्रमाण प्राकृत आहे की नाही, त्यांची हालचाल चांगली आहे की नाही यासाठी वीर्य तपासणी करतात.

(क्रमशः)

डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



माजी आ.आमदार स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्हा संघाची निवड चाचणी पाईपलाईन रोडवरील संभाजीराजे कुस्ती संकुल येथे पार पडली.

स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ

अहिल्यानगरमध्ये २५ ते २८ डिसेंबर दरम्यान

‘राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धे’चे आयोजन



नगर – अहिल्यानगरच्या वाडियापार्क क्रीडा संकुल मधील बॅडमिंटन हॉलमध्ये राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेचे आयोजन २५ ते २७ डिसेंबर रोजी करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष आ.संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली होणारी ही स्पर्धा होणार आहेत. या स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्हा संघाची निवड चाचणी पाईपलाईन रोडवरील संभाजीराजे कुस्ती संकुल येथे पार पडली. यामधील प्रथम व द्वितीय आलेल्या कुस्तीगीरांची जिल्हा संघात निवड करण्यता आली आहे, अशी माहिती अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाचे सचिव प्रा. डॉ. पै. संतोष भुजबळ यांनी दिली.

या प्रसंगी संघटनेचे खजिनदार पै. शिवाजी चव्हाण, कार्यालयीन सचिव निलेश मदने, जिल्हा कार्यकारिणी सदस्य पै. युवराज करंजुले, पै. प्रमोद गोडसे, पै. शंकर खोसे, पै. धनंजय खर्से, पै. उमेश भागानगरे, पै. युवराज चव्हाण, पै. संदिप गायकवाड आदी उपस्थित होते.

माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ आयोजित राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेच्या निवड चाचणी स्पर्धेत एकूण २१५ कुस्तीगीरांनी सहभाग घेतला होता. यातील प्रथम क्रमांकाने निवड झालेल्या १५ वर्षाखालील कुस्तीगीरांचे २५ डिसेंबर रोजी सामने होणार असून २० वर्षाखालील कुस्तीगीरांचे २७ डिसेंबर रोजी वाडियापार्कच्या बॅडमिंटन हॉलमध्ये होणाऱ्या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील. तसेच ५ डिसेंबर रोजी १७ वर्षाखालील आणि वरिष्ठ ग्रीको रोमन स्पर्धेसाठी जिल्हा निवड चाचणी होणार आहे, अशी माहिती जिल्हा कुस्तीगीर संघांचे कार्यालयीन सचिव निलेश मदने यांनी दिली.

राज्य अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्हा संघात निवड झालेले कुस्तीगीर पुढीलप्रमाणे – १५ वर्षाखालील फ्री स्टाईल ३८ किलो गट प्रथम विश्वजीत महारनवर जामखेड व द्वितीय सोहम समुद्र कर्जत. ४१ किलो गट प्रथम शिवमनी घुगे शेवगाव व द्वितीय साईराज कदम कर्जत. ४४ किलो गट प्रथम अर्णव नरसाळे पारनेर व द्वितीय युवराज बारवकर शेवगाव. ४८ किलो गट प्रथम हर्षल म्हस्के नगर व द्वितीय अरमान खान श्रीगोंदा. ५२ किलो गट प्रथम ओम कडू जामखेड व द्वितीय सूरज पवार श्रीगोंदा. ५७ किलो गट प्रथम वीर लष्करे पारनेर व द्वितीय अभिनव लिमगिरे नगर. ६२ प्रथम सार्थक गावडे कर्जत व द्वितीय किरण मगर नगर. ६८ प्रथम कानिफनाथ दुसुंगे नगर व द्वितीय उदय गायकवाड नगर. ७५ प्रथम शुभम राठोड पाथर्डी व द्वितीय विराज शेळके नगर. ८५ किलो गट प्रथम ओम खर्से नगर व द्वितीय विररराजे लिमगिरे नगर.

१५ वर्षाखालील ग्रीको रोमन गटासाठी निवडलेले खेळाडू ३८ किलो गट प्रथम सत्यम चौधरी नेवासा व द्वितीय अथर्व खेडकर श्रीगोंदा. ४१ किलो गट प्रथम समर्थ कराळे नगर व द्वितीय सार्थक तागड नगर. ४४ किलो गट प्रथम योगेश आंधळे शेवगाव व द्वितीय निरंक. ४८ किलो गट प्रथम अथर्व धामणे नगर व द्वितीय रुद्राक्ष घुगे शेवगाव. ५२ किलो गट प्रथम करण हटकर राहुरी व द्वितीय साई वाघुले नगर. ५७ किलो गट प्रथम प्रतिक गायकवाड नगर व द्वितीय रुद्रप्रताप देशमुख कर्जत. ६२ किलो गट प्रथम आदित्य ठुबे पारनेर व द्वितीय शंभूराज जाधव कर्जत. ६८ किलो गट प्रथम सुजल इंगळे नगर व द्वितीय निरंक. ७५ प्रथम अभिषेक विधाटे नेवासा व द्वितीय माधव शिंदे कर्जत ८५ किलो गट प्रथम संग्राम बारगुजे व द्वितीय आयुष बेरड नगर.

२० वर्षाखालील फ्री स्टाईल प्रकारातील खेळाडू पुढीलप्रमाणे – ५७ किलो गट प्रथम सूरज जाधव नगर व द्वितीय अमृत घोडके नगर. ६१ किलो गट प्रथम तुषार धामणे नगर व द्वितीय विशाल कुल्लाळ नगर. ६५ किलो गट प्रथम ज्ञानेश्वर आडसरे शेवगाव व द्वितीय आदित्य खताळ नगर. ७० किलो गट प्रथम नितीन वाळुंज पारनेर व द्वितीय राधे कचरे नगर. ७४ किलो गट प्रथम उत्कर्ष कडिले नगर व द्वितीय ओंकार फंड श्रीगोंदा. ७९ किलो गट प्रथम शौर्य मदने नगर व द्वितीय सुयोग माने कर्जत. ८६ किलो गट प्रथम कार्तिक निकम नगर व द्वितीय राहुल शेंडगे श्रीगोंदा. ९२ किलो गट प्रथम ओंकार मुळे पाथर्डी व द्वितीय निरंक. ९७ किलो गट प्रथम संस्कार भोसले नगर व द्वितीय देवराज खोसे नगर. १२५ किलो गट प्रथम प्रशांत तहकीक शेवगाव व द्वितीय सुजित करगळ जामखेड.

२० वर्षाखालील ग्रीको रोमन प्रकारातील निवडलेले खेळाडू पुढीलप्रमाणे ५५ किलो गट प्रथम अर्जुन जाधव नगर व द्वितीय आरीश शेख नगर. ६० किलो गट प्रथम अमीर शेख नगर व द्वितीय प्रथमेश बनकर नगर. ६३ किलो गट प्रथम साई खेतमाळीस श्रीगोंदा व द्वितीय निरंक. ६७ किलो गट प्रथम प्रतिक रोहोकले पारनेर व द्वितीय तुषार रणसिंग राहुरी. ७२ किलो गट प्रथम संदिप गायकवाड श्रीगोंदा व द्वितीय अविष्कार नरसाळे पारनेर. ७७ किलो गट प्रथम समर्थ गायकवाड नेवासा व द्वितीय निरंक. ८२ किलो गट प्रथम समर्थ खेतमाळीस श्रीगोंदा व द्वितीय रुद्र शिंदे नगर. ८७ प्रथम गौरव रोहोकले पारनेर व द्वितीय स्वराज शिंदे नगर. ९७ किलो गट प्रथम राजवर्धन कातोरे श्रीगोंदा व द्वितीय ओंकार नवघरे पाथर्डी. १३० किलो गट प्रथम हर्षवर्धन गांगर्डे श्रीगोंदा व द्वितीय निरंक.

या निवड चाचणी स्पर्धेसाठी पंच आणि तांत्रिक अधिकारी म्हणून प्रा. डॉ. संतोष भुजबळ, निलेश मदने, विवेक नायकल, गणेश जाधव, मयूर रोहोकले, मनोज शिंदे यांनी काम पहिले.

विकसित भारतात आरोग्य उपचार सर्वांना मिळाले पाहिजे : डॉ. दीपक

एक दिवसात ५ हजार पेक्षा जास्त ई सी जी साठी जागतिक नोंद प्रमाणपत्र प्रदान



नवी दिल्ली येथे १५ नोव्हेंबर रोजी आयोजित ४थ्या जागतिक परिसंवाद मध्ये डॉ. दीपक प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. समवेत अध्यक्षस्थानी खासदार रमेश अवस्थी आदी.

नगर – येणाऱ्या २०४७ पर्यंत विकसित भारत मध्ये देशातील प्रत्येक व्यक्तीला वैद्यकीय उपचार मिळतील असे प्रयत्न व्हायला हवे यामुळे एकूण समाज सुदृढ होईल तसेच कुणीही आरोग्य उपचारापासून वंचित राहणार नाही असे प्रतिपादन साईदीप मणिपाल हॉस्पिटलचे चेअरमन डॉ. दीपक एस एस यांनी केले. एकाच दिवशी ५८६९ ई सी जी करून विश्व विक्रम केल्याने साईदीप मणिपाल हॉस्पिटलला जागतिक नोंद म्हणून बुक ऑफ रेकॉर्ड्स चे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

नवी दिल्ली येथे १५ नोव्हेंबर रोजी आयोजित ४थ्या जागतिक परिसंवाद मध्ये डॉ. दीपक प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमच्या अध्यक्षस्थानी खासदार रमेश अवस्थी होते. या परिसंवाद ला सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, राजस्थान व हिमचाल प्रदेश चे माजी राज्यपाल डॉ. कालराज मिश्र यांनी शुभेच्छा संदेश पाठवले. तसेच यु के देशातील जॉन रेनफोर्ड, डॉ. डॅनईल ब्राउन, डॉ. दिवाकर सुकूल उपस्थित होते. डॉ. दीपक यांनी १५ वर्षान पूर्वी अनेक रुग्णांना अत्याधुनिक उपचार पद्धती नसल्याने आपले जीव गमवावे लागले परंतु नरेंद्र मोदी यांनी आरोग्य व्यवस्थेत अमुलाग्रह बदल केल्याने व नवीन उपचार पद्धतही चा अवलंब केल्याने अल्प दरात उच्चतम उपचार मिळण्यास सुरवात झाली. देशातील सध्या चिंतेची बाब आहे. कॅन्सर आणि या करीता टार्गेटेड रेडियशन थेरपी, गुडघ्याचे व खुब्याचे सांधे रोपण रोबोटीक पद्धतीने केले जात आहेत. अवयोव प्रत्यरोपण ज्या मध्ये किडनी, लिव्हर हे अवयोव बदलण्यासाठी विदेशात जावे लागत होते. पण आता हे भारतात शक्य व सुरु आहे. पुढील काळात २०४७ मध्ये यापेक्षा ही अत्याधुनिक उपचार पद्धती अमलात येणार आहे. ज्या मुळे आपल्या देशाची जनता सुदृढ व निरोगी राहण्यास मदत मिळेल आत्मनिर्भर आणि विकसित भारत मध्ये अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे आपल्याच देशात तयार होऊन सेवा देतील आपण पाहतो की कुटुंबात एक व्यक्ती आजारी पडली की संपूर्ण कुटुंब आजारी असल्यासारखी परिस्थिती निर्माण होते आणि ते आज धावपळीच्या जीवनात कुणाला ही परवडत नाही सोबतच लोकांनी योग्य आहार व नियमित व्यायाम केल्याने सुद्धा आजारपण दूर ठेवता येतात.

यावेळी बोलताना डॉ. दिवाकर सुकूल यांनी साईदीप मणिपाल हॉस्पिटल ने जागतिक रेकॉर्ड केले आहे. एकाच दिवशी ५८६९ लोकांचे ई सी जी करून नवीन विक्रम स्थापन केला आहे ज्या मध्ये एकूण ६% तपासणी केलेल्या लोकांन मध्ये हृदयाशी संबंधित अनियमितता आढळल्याने त्यांना पुढील तपासणी व त्यांच्या वर आवश्यक मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली. तसेच तपासणी दरम्यान एका व्यक्तीस हृदयविकाराचा झटका आल्याने अंजीयोप्लास्टी केली गेली याची दखल घेऊन जागतिक बुक ऑफ रेकॉर्ड्स तर्फे प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे. हृदय निरोगी तर आयुष निरोगी (दिल फिट तो सब फिट).

यावेळी अनेकांनी त्यांचे विचार मांडले. या परिसंवाद मध्ये एकूण ६ विषयांवर मान्यवारांनी मत मांडले. वैद्यकीय क्षेत्रातून डॉ. दीपक एस एस यांनी विचार मांडले.

हॉटेलसमोरून मोटरसायकलची चोरी; गुन्हा दाखल

शेवगाव – शेवगाव तालुक्यातील कऱ्हेटाकळी येथील राजेशाही हॉटेलसमोरून एक मोटरसायकल अज्ञात इसमाने चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रवीण रामनाथ थोरात (वय ३५ वर्षे, रा. कुरुडगाव, ता. शेवगाव, हल्ली रा. अनेकरवाडी, चाकण, ता. खेड, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे १५ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजता पैठणहून आपल्या गावी जात असताना कऱ्हेटाकळी येथील राजेशाही हॉटेलसमोर बाथरूमसाठी थांबले होते. त्यावेळी अज्ञात इसमाने त्यांची हिरो कंपनीची स्प्लेंडर प्लस मोटरसायकल (क्र. एमएच १६ डीएक्स ६८३६) चोरून नेली. याबाबत त्यांनी २० नोव्हेंबर रोजी शेवगाव पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बीएनएस कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्याच्या पुरुष व महिला संघांची निवड जाहीर

२८ नोव्हेंबरपासून न्यू आर्टस् कॉलेजच्या मैदानांवर सामने

नगर – न्यू आर्टस् कॉलेजच्या मैदानावर माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप क्रीडानगरीत ६५ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचा थरार अनुभवण्यासाठी लाल मातीचे मैदान सज्ज झाले आहे. २८ नोव्हेंबर ते १ डिसेंबर या कालावधीत या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते खो-खो खांबाचे पूजन करण्यात आले.

राज्यस्तरीय स्पर्धेसाठी मैदानाची तयारी पूर्ण झाली असून, राष्ट्रीय स्तरावरील सामने खेळविण्यासाठी आवश्यक असलेल्या दर्जानुसार मैदान तयार करण्यात आले आहे. प्रेक्षकांना सामने पाहता यावेत यासाठी गॅलरी उभारण्यात आली आहे. विशेष म्हणजे, एकाच वेळी चार मैदानांवर सामने खेळविण्यात येणार असून, त्यामुळे प्रेक्षकांना एकाच वेळी चार सामन्यांचा आनंद घेता येणार आहे. स्पर्धेतील सामने सकाळी ७ ते १० आणि रात्री ७ ते १० या वेळेत विद्युत रोषणाईमध्ये रंगणार आहेत. चारही मैदानांवरील सामन्यांचे लाईव्ह प्रक्षेपणही दाखविण्यात येणार आहे.

यावेळी आमदार संग्राम जगताप म्हणाले की, महाराष्ट्र राज्याला मैदानी खेळांची मोठी परंपरा लाभली आहे. क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास होण्याबरोबरच शारीरिक क्षमताही वाढते. शालेय शिक्षणासोबत विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या खेळाकडे वळणे आवश्यक आहे. खो-खो या पारंपरिक खेळाचा थरार आता अहिल्यानगर जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींना अनुभवता येणार आहे.

क्रीडा स्पर्धांच्या माध्यमातून खेळाडू घडत असतात. आज क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याच्या विविध संधी उपलब्ध आहेत. जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर खेळाडूंना यश संपादन करता येते. अशा राज्यस्तरीय स्पर्धांमुळे खेळाडूंना ऊर्जा आणि प्रेरणा मिळते. यासाठीच अहिल्यानगर शहरात विविध क्रीडा प्रकारांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींनी या स्पर्धांना उपस्थित राहावे, असे आवाहन त्यांनी केले.

खो-खो संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. विश्वासराव आठरे म्हणाले की, राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेचे आयोजन अहिल्यानगर शहरात होत आहे, ही आनंदाची बाब आहे. आमदार जगताप हे नेहमीच खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे काम करतात. या स्पर्धेच्या माध्यमातून राज्यातील उत्कृष्ट खेळाडूंच्या खेळाचे प्रदर्शन पाहायला मिळणार असून, स्थानिक खेळाडूंनाही त्यातून प्रेरणा मिळेल. अशा स्पर्धांमधून चांगले खेळाडू निर्माण होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

नगरसेवक निखिल वारे म्हणाले की, न्यू आर्टस् कॉलेजचे मैदान लाल मातीने सज्ज झाले आहे. एकाच वेळी चार मैदानांवर सामने खेळविण्यात येणार असून, सामन्यांचे लाईव्ह प्रक्षेपणही दाखविण्यात येणार आहे. स्पर्धेची संपूर्ण तयारी करण्यात आली असून, अहिल्यानगर जिल्ह्यातील क्रीडाप्रेमींनी या स्पर्धेचा आनंद घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.



न्यू आर्टस् कॉलेजच्या मैदानावर माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप क्रीडानगरीत ६५ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचा थरार अनुभवण्यासाठी लाल मातीचे मैदान सज्ज झाले असून याप्रसंगी आमदार संग्राम जगताप, खो-खो संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. विश्वासराव आठरे आदींसह खेळाडू उपस्थित होते. (छायाचित्र : लहू दळवी)

राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेसाठी अहिल्यानगर जिल्ह्याच्या पुरुष व महिला संघांची निवड करण्यात आली आहे.

पुरुष संघ – १. गौरव सोमवंशी २. सोहम पवार ३. रुद्राक्ष नेटके ४. गौरव कुदळे ५. अभिनव गवळी ६. आयुष म्हस्के ७. पुष्कर चिप्पा ८. राज शेटे ९. सुयश क्षीरसागर १०. पियुष म्हस्के ११. मनोज पवार १२. रिंकू वळवी १३. विशाल डुकळे १४. हरीश काळे १५. कुणाल थोरात. प्रशिक्षक : अभिषेक पवार व्यवस्थापक : किरण बोराटे

महिला संघ – १. मोना घनवट २. स्वामिनी साखरे ३. स्वरा नाईकवाडी ४. वैष्णवी मारकड ५. रुणाली प्रजापती ६. कार्तिकी नगरकर ७. जळवंती पाडवी ८. स्वरा गंभीरे ९. श्रावणी शिरसाठ १०. योगिता पाडवी ११. काव्या राठोड १२. आराध्या राठोड १३. गायत्री शिर्के १४. श्रावणी दळवी १५. प्रतीक्षा सुपेकर. प्रशिक्षक : सचिन शिरसाट., व्यवस्थापक : राजश्री शिरसाट

या प्रसंगी खो-खो संघटनेचे जिल्हाध्यक्ष ॲड. विश्वासराव आठरे, नगरसेवक निखिल वारे, सीए अशोक पितळे, माजी नगरसेवक बाळासाहेब पवार, ज्ञानेश्वर काळे, निर्मलचंद्र थोरात, खो-खो संघटनेचे सचिव विकास परदेशी, खजिनदार गौरव पितळे, प्राचार्य बाळासाहेब सागडे, सुमतीलाल कोठारी, सोमनाथ जाधव, संभाजी पवार, विकी वाघ, संतोष लांडे, गोकुळ काळे, हेमंत थोरात, सुनील थोरात, रावसाहेब बाबर आदींसह खेळाडू उपस्थित होते.

मोबाईल टॉवरवरून सहा बॅटऱ्यांची चोरी

राहुरी – राहुरी तालुक्यातील गडधे आखाडा येथील बीएसएनएल टॉवरवरून १ लाख ५० हजार रुपये किमतीच्या ६ ६ बॅटऱ्या अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत प्रदीप दत्तात्रय गारूडकर (वय ३७ वर्षे, रा. केडगाव, अहिल्यानगर) यांनी फिर्याद दिली आहे. २० नोव्हेंबर रोजी पहाटे ५ वाजण्याच्या पूर्वी गडधे आखाडा, ता. राहुरी येथील बीएसएनएल टॉवरवरून 'लिनिएज' कंपनीच्या १०० एएच क्षमतेच्या, प्रत्येकी २५ हजार रुपये किमतीच्या ६ बॅटऱ्या अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या. या फिर्यादी वरून राहुरी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

अभ्यासाबरोबर खेळही तितकेच महत्त्वाचे : श्रीपाद कुलकर्णी





श्री समर्थ विद्यामंदिर शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या औचित्याने वाडिया पार्क मैदानावर विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

श्री समर्थ विद्यामंदिर शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनात क्रीडांगणात रंगला उत्साह

नगर – विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात खेळांचा मोठा वाटा आहे. अभ्यास आणि बौद्धिक उपक्रमांसोबतच मैदानी खेळ हे आरोग्य, शिस्त, टीमवर्क आणि मानसिक सुदृढतेसाठी अत्यंत आवश्यक आहेत. शाळेत दरवर्षी पाठांतर, निबंध, हस्ताक्षर, चित्रकला अशा स्पर्धा घेतल्या जातात; परंतु विद्यार्थ्यांच्या शारीरिक क्षमतेचा विकास व्हावा म्हणून कबड्डी, खो-खो, लंगडी, धावणे, संगीत खुर्ची यांसारख्या स्पर्धांचे आयोजन करणे शाळेची परंपरा आहे, असे प्रतिपादन उद्घाटनप्रसंगी शालेय समिती चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांनी केले. खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, खिलाडूवृत्ती, संघभावना आणि नेतृत्वगुण विकसित होतात. जिंकणे आणि हरणे यापेक्षा स्पर्धेत सहभागी होणे, नियमांचे पालन करणे आणि मेहनतीने आपले कौशल्य वाढवणे अधिक महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच खेळांमध्येही सक्रिय सहभाग घेऊन आपले व्यक्तिमत्त्व घडवावे, असे त्यांनी आवाहन केले.

श्री समर्थ विद्यामंदिर शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या औचित्याने वाडिया पार्क मैदानावर विद्यार्थ्यांसाठी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. क्रीडा मेळाव्याचे उद्घाटन संस्थेचे व्हाइस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. त्यांनी हवेत फुगे सोडून व श्रीफळ वाढवून स्पर्धांना प्रारंभ केला. या स्पर्धांमध्ये विविध वयोगटातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

या स्पर्धांचे आयोजन यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष भा. ल जोशी, उपाध्यक्ष दीपक ओहोळ, चेअरमन विकास सोनटक्के, व्हाईस चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सेक्रेटरी प्र. एस. ओहोळ, सुरेश क्षीरसागर, संस्थेचे खजिनदार संजय कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य ॲड. के.एम. देशपांडे, स्व.श. कुलकर्णी, सौ.संध्या कुलकर्णी, वेद देशपांडे, सुनील जोशी, सचिन शिरसागर, स्वप्निल सोनटक्के यांनी मार्गदर्शन आणि सहकार्य केले.

या प्रसंगी मुख्याध्यापक अजय महाजन यांनी प्रस्ताविकात शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये क्रीडा स्पर्धांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्यात खेळाची आवड निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी प्रत्येक स्पर्धेत सहभाग नोंदवावा, खेळातून शिस्त, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन आत्मसात करावा, असे आवाहन त्यांनी केले.

कबड्डी, खो-खो, लंगडी, स्प्रिंट शर्यती, बॉल थ्रो, संगीत खुर्ची अशा अनेक खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. मैदानावर मुलांच्या जलद हालचाली, मुलींची खो-खोतील चुरस, धावण्यातील वेग, आणि छोट्या गटातील संगीत खुर्चीतील उत्साहाची स्पर्धा असे विविध रंग मैदानावर खुलले. पालक आणि शिक्षकांच्या उपस्थितीमुळे स्पर्धांना अधिक उत्साह प्राप्त झाला.

स्पर्धांचे नियोजन व व्यवस्थापन सतीश मेढे, शंकर निंबाळकर, किशोर महाजन, श्रीमती शीतल जऱ्हाड, सौ. सविता येवले, श्रीमती प्रमिला आल्हाट, श्रीमती तिलोत्तमा क्षीरसागर यांनी काटेकोरपणे केले. सुरक्षिततेच्या सर्व बाबींची दक्षता घेत संपूर्ण दिवस विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षकांनी केले.

कार्यक्रमाची सांगता विजेत्या विद्यार्थ्यांच्या गौरवाने झाली. विविध स्पर्धांमध्ये विजयी ठरलेल्या विद्यार्थ्यांना शाळेतर्फे वार्षिक स्नेहसंमेलन वेळी प्रशस्तीपत्रे व गौरवचिन्हे देण्यात येणार आहे.

स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या कृषी दृष्टीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड हवी

कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांचे प्रतिपादन; महात्मा फुले कृषी विद्यापीठ व न्यू आर्टस् महाविद्यालय यांच्यात सामंजस्य करारासाठी सकारात्मक भूमिका

नगर – स्व. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या जडणघडणीत शेती, पाणी व्यवस्थापन आणि मृदसंधारण यांना केंद्रस्थानी ठेवले. बदलत्या हवामानाच्या आजच्या काळात त्यांच्या या दूरदृष्टीला माहिती तंत्रज्ञान, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (कृत्रिम बुद्धिमत्ता) आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी केले.



यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहिल्यानगर आणि न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित यशवंत व्याख्यानमालेत प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे.

यशवंतराव चव्हाण व्यासपीठ, अहिल्यानगर आणि न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित यशवंत व्याख्यानमालेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. महाविद्यालयाच्या राजर्षी शाहू महाराज सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे होते. संस्थेचे सचिव विश्वासराव आठरे यावेळी उपस्थित होते.

सिंचनाचे जाळे विस्तारण्यास चालना

डॉ. खर्चे यांनी यशवंतरावांच्या कृषीविषयक कार्याचा सविस्तर आढावा घेतला. ते म्हणाले की, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून यशवंतरावांनी शेतीला पाणी मिळावे यासाठी राज्यात वेगवेगळी धरणे उभारली आणि सिंचनाचे जाळे विस्तारण्यास चालना दिली. जमीन सुधारणा कायद्यांच्या माध्यमातून कसणाऱ्या शेतकऱ्याला जमिनीवर हक्क मिळवून देणारे आणि जमिनीच्या न्याय्य वाटपाचा मार्ग खुला करणारे क्रांतिकारी निर्णय त्यांनी घेतले. सहकारी चळवळीला बळ देऊन ग्रामीण भागात साखर कारखाने, सहकारी बँका आणि सोसायट्यांचे जाळे उभे केले, त्यामुळे शेतकऱ्याला पतपुरवठा आणि शेतमालाला हक्काची बाजारपेठ मिळाली.

पंचायतराज व्यवस्थेद्वारे सत्तेचे विकेंद्रीकरण

पंचायतराज व्यवस्थेद्वारे सत्तेचे विकेंद्रीकरण करून त्यांनी गावपातळीवरील विकासाचे निर्णय ग्रामीण जनतेच्या हाती दिले. शेतीला उद्योगाची जोड देणारी कृषी-औद्योगिक समाजरचना हे यशवंतरावांचे स्वप्न होते. आज महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दिसणारी समृद्धी ही त्यांच्या त्या दूरदृष्टीची फलश्रुती आहे, असे गौरवोद्गार डॉ. खर्चे यांनी काढले.

शेतीतील पाण्याचे काटेकोर नियोजन हवे

सध्या एल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण व वितरण अनियमित झाले असून जमिनीतील पाण्याची पातळी सातत्याने खालावत आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. कृषी विद्यापीठांमध्ये होणारे नवनवीन संशोधन प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या बांधापर्यंत पोहोचविण्यासाठी आणखी प्रयत्नांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. शेतीतील पाण्याचे काटेकोर नियोजन, जमिनीतील ओलाव्याचे मोजमाप, हवामानाचा अचूक अंदाज आणि पिकांवरील रोगांचे वेळीच निदान यांसाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स व इंटरनेट ऑफ थिंग्जसारखे तंत्रज्ञान उपयुक्त ठरू शकते. त्यासाठी कृषी संशोधक आणि माहिती तंत्रज्ञानातील तज्ज्ञ व विद्यार्थी यांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

सामंजस्य करार करण्यास अनुकूलता

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून देताना, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित कृषी संशोधनासाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज यांच्यात सामंजस्य करार करावा, असे आवाहन कुलगुरूंना केले होते. त्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत डॉ. खर्चे यांनी असा सामंजस्य करार करण्यास अनुकूलता दर्शविली. विद्यापीठाचे अधिष्ठाता आणि महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्या समन्वयातून याबाबतचे काम लवकरच सुरू करण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी केली.

महाराष्ट्राच्या राजकारणावर स्वतःचा वेगळा ठसा

रामचंद्र दरे म्हणाले की, साठच्या दशकात यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या राजकारणावर स्वतःचा वेगळा ठसा उमटवला. जलसंधारणाची कामे तसेच शैक्षणिक फी माफीसारखा ऐतिहासिक निर्णय घेऊन त्यांनी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यामुळेच ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थी शिकू शकले, असे सांगून त्यांनी यशवंतरावांच्या कार्याचा उहापोह केला.

शैक्षणिक-सामाजिक क्षेत्रातील उपक्रमांचा आढावा

प्रास्ताविक यशवंतराव चव्हाण व्यासपीठाचे अध्यक्ष, माजी कुलगुरू प्रा. डॉ. सर्जेराव निमसे यांनी केले. व्यासपीठामार्फत वर्षभर राबविल्या जाणाऱ्या यशवंत व्याख्यानमालेचा आणि शैक्षणिक-सामाजिक क्षेत्रातील उपक्रमांचा त्यांनी आढावा घेतला. युगप्रवर्तक यशवंतराव चव्हाण या ग्रंथनिर्मितीच्या माध्यमातून यशवंतरावांचे चरित्र समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी व्यासपीठ प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास संस्थेच्या खजिनदार दीपलक्ष्मी म्हसे पाटील, यशवंतराव चव्हाण व्यासपीठाचे उपाध्यक्ष व अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे विश्वस्त जयंत वाघ, कार्यकारी मंडळाचे सदस्य प्रा. अर्जुनराव पोकळे, प्रकाश झावरे, प्राचार्य डॉ. मच्छिंद्र तांबे, प्राचार्य डॉ. वाय. आर. खर्डे, नवनाथ धुमाळ, किसनराव लोटके आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. दशरथ खोसे यांनी केले. व्यासपीठाचे कार्याध्यक्ष प्राचार्य खासेराव शितोळे यांनी आभार मानले.

योग विद्या धामतर्फे १ डिसेंबरपासून सावेडीत २१ दिवसांचे विशेष योग वर्ग

नगर – वाढती धावपळ, बदललेली जीवनशैली, बैठ्या कामाचे स्वरूप, अनियमित आहार आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे अनेकांना वजनवाढ व स्थूलतेच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. वाढत्या वजनामुळे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेता नियमित योगाभ्यास, व्यायाम आणि शिस्तबद्ध जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित होत आहे. याच उद्देशाने योग विद्या धाम, अहिल्यानगर यांच्या वतीने स्थूलता निवारण योग वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे.

या विशेष योग वर्गामध्ये केवळ २१ दिवसांच्या योगाभ्यासातून १ ते ४ किलो वजन कमी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. योगासने, शारीरिक हालचाली, श्वसनाचे व्यायाम आणि नियमित सराव यांच्या माध्यमातून शरीराला सक्रिय ठेवण्याबरोबरच वजन नियंत्रणासाठी आवश्यक सवयी विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. आधुनिक जीवनशैलीमुळे व्यायामासाठी वेळ न मिळणाऱ्या नागरिकांसाठी हा योग वर्ग उपयुक्त ठरणार आहे.

योग विद्या धामच्या वतीने आयोजित हा वर्ग १ डिसेंबरपासून दररोज सायंकाळी ४.३० ते ६ वाजेपर्यंत सुरू होणार असून, योग भवन, भिस्तबाग रोड, सावेडी येथे वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. या वर्गामध्ये सहभागी होणाऱ्यांना नियमित योगाभ्यासाची सवय लावून शरीर निरोगी व तंदुरुस्त ठेवण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे.

वाढत्या वजनाकडे दुर्लक्ष न करता योग्य वेळी व्यायाम व योगाभ्यासाची सुरुवात करणे आवश्यक आहे. दैनंदिन जीवनात योगाचा समावेश केल्यास शारीरिक आरोग्यासोबत मानसिक स्वास्थ्य, उत्साह आणि सकारात्मकता टिकविण्यास मदत होते. त्यामुळे वजन नियंत्रणासाठी प्रयत्नशील असलेल्या नागरिकांनी या योग वर्गाचा लाभ घ्यावा, असे आवाहन योग विद्या धामच्या वतीने करण्यात आले आहे. या योग वर्गासंदर्भात अधिक माहिती व प्रवेशासाठी इच्छुकांनी श्री. वेसीकर किंवा शेखर एडके यांच्याशी संपर्क साधावा. योग विद्या धामचे अध्यक्ष डॉ. सुंदर गोरे यांनी नागरिकांनी या उपक्रमात सहभागी होऊन आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा स्वीकार करावा, असे आवाहन केले आहे.

विश्व हिंदू परिषद हितचिंतक नोंदणी अभियानाचा शुभारंभ

कोतूळ – श्री वरदविनायक देवस्थान, कोतूळ यांच्या वतीने विश्व हिंदू परिषदेचे आंतरराष्ट्रीय महामंत्री स्व. अशोक सिंघल यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित सर्वरोग निदान व उपचार महाआरोग्य शिबिर तसेच रुग्णोपयोगी साहित्य भांडार लोकार्पण सोहळ्यात हितचिंतक नोंदणी अभियानाचा शुभारंभ जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते पहिली नोंदणी करून करण्यात आला.



यावेळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अभियानास शुभेच्छा दिल्या. देशाच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात विश्व हिंदू परिषदेचे योगदान अनन्यसाधारण असल्याचे सांगून, या अभियानाच्या माध्यमातून परिषदेचे कार्य अधिक व्यापक होईल. देश, देव आणि धर्म ही संकल्पना हिंदू समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रांत मंत्री किशोर चव्हाण यांनी अभियानाची माहिती देताना नागरिकांनी हितचिंतक म्हणून नोंदणी करून या कार्यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

या अभियानाच्या पहिल्या दिवशी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी आमदार वैभव पिचड, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख शिवाजी राजे धुमाळ, अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सिताराम पाटील गायकर आदींनी नोंदणी केली.

यावेळी राष्ट्रीय सहमंत्री शंकर गायकर, प्रांत मंत्री किशोर चव्हाण, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक किशोर निर्मळ, भारतीय जनता पार्टीचे प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, माजी आमदार वैभव पिचड, अगस्ती सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सिताराम पाटील गायकर, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख शिवाजी राजे धुमाळ, श्री वरदविनायक देवस्थानचे अध्यक्ष प्रदीप भाटे, विश्व हिंदू परिषदेचे प्रांत गोरक्षा प्रमुख संतोष खामकर, प्रांत धर्मप्रसार प्रमुख मृणालिनीताई पडवळ, प्रांत निधी प्रमुख धनाजी शिंदे, जिल्हा गोरक्षा प्रमुख रवींद्र पाबळे, मंदिर-अर्चक-पुरोहित आयाम विभाग प्रमुख गजेंद्र सोनवणे, जिल्हा सहमंत्री गोपाल राठी, जिल्हा मंत्री अनिल जोशी, जिल्हा उपाध्यक्ष वसंत सिंह, बजरंग दल विभाग संयोजक कुलदीप ठाकूर, मंदिर-अर्चक संपर्कप्रमुख प्रशांत बहिरट यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री वरद विनायक देवस्थानचे अध्यक्ष प्रदीप भाटे यांनी स्वागत केले.

गुरुनानक देवजींच्या ५५७ व्या प्रकाश गुरुपुरबचा भक्तिमय सोहळा; गुरुद्वारा निनादला गुरुबाणीने!

नगर – शीख धर्माचे प्रथम पातशाही धन धन श्री गुरु नानक देवजी महाराज यांच्या ५५७ व्या प्रकाश गुरुपुरबचा सोहळा येथील ऐतिहासिक गुरुद्वारा भाई दया सिंगजी, गोविंदपुरा येथे २४ नोव्हेंबरला भक्तिमय वातावरणात पार पडला. गुरुबाणीचे मधुर स्वर, 'वाहेगुरु, वाहेगुरु, धन गुरु नानक'चा जयघोष, अखंडपाठ साहिब, कीर्तन दरबार आणि गुरू का लंगर अशा विविध धार्मिक व सेवाभावी उपक्रमांनी संपूर्ण गुरुद्वारा परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. या सोहळ्याला अहिल्यानगरसह परिसरातील शीख समाजबांधव उपस्थिती लावली.





प्रकाश गुरुपुरबच्या निमित्ताने १७ ते २१ नोव्हेंबर या कालावधीत शहरातील विविध भागांतून दररोज सकाळी प्रभात फेऱ्यांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रभात फेऱ्यांमध्ये संगत सहभागी झाली होती. गुरुबाणीचे गायन आणि 'वाहेगुरु, वाहेगुरु, धन गुरु नानक'च्या जयघोषाने शहरातील वातावरण भक्तिमय झाले. पारंपरिक पद्धतीने काढण्यात आलेल्या या प्रभात फेऱ्यांमधून गुरुनानक देवजी यांच्या विचारांचा आणि शिकवणुकीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला.

प्रकाश गुरुपुरबनिमित्त सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांनी गुरुद्वारा भाई दया सिंगजी, गोविंदपुरा येथे भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी त्यांनी शीख समाजबांधवांना गुरुनानक देवजी यांच्या जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेवक मोहित पंजाबी, जितू गंभीर, संजय चोपडा, बाली बांगरे, प्रा. माणिक विधाते, बाळासाहेब बारस्कर उपस्थित होते.

यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले की, गुरुनानक देवजी यांनी समाजातील वंचितांची सेवा करण्याचा संदेश दिला. त्यांनी लंगरची मुहूर्तमेढ रोवून आपल्याकडे असलेले गरजूंना देण्याची शिकवण दिली. फक्त पैसा देणे म्हणजे सेवा नसून, पैसा नसताना देखील श्रमदानातून सेवा करण्याची शिकवण देखील त्यांनी दिली. त्यांचे अमूल्य शिकवण आजही समाजाला प्रेरक असून, ते आत्मसात करुन जीवनात पुढे जाण्याचे त्यांनी आवाहन केले.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, गुरुनानक देवजी यांनी शीख धर्माची स्थापना केली. या धर्माला शौर्याचा इतिहास आहे. धर्माचे शौर्य व त्याग न विसरता येणारे आहे. शीख समाज बांधव गुरुनानक देवजी यांच्या आशीर्वादाने पाकिस्तानात मोठ्या धाडसाने राहत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

गुरुद्वारा साहिब येथे संगतांच्या सहभागातून सांझा अखंडपाठ साहिबचे आयोजन करण्यात आले होते. या अखंडपाठ साहिबचा आरंभ २० नोव्हेंबर रोजी झाला, तर २२ नोव्हेंबर रोजी भोग साहिब संपन्न झाला. यानिमित्त आयोजित कीर्तन दरबारात कीर्तन जथा भाई मनराज सिंग जी (मार्कंडेवाले) तसेच हजुरी रागी भाई अमृत सिंग जी यांनी आपल्या मधुर गुरबाणी कीर्तनाने संगतांना निहाल केले. त्यांच्या भक्तिमय कीर्तन सेवेमुळे संपूर्ण गुरुद्वारा परिसर भक्तिरसात रंगून गेला.

कार्यक्रमाच्या संपूर्ण कालावधीत गुरुद्वारा साहिब येथे लंगर सेवेचे आयोजन करण्यात आले होते. हजारो श्रद्धाळू संगतांनी गुरू का लंगर ग्रहण करून या सेवेचा लाभ घेतला. गुरू का लंगरच्या माध्यमातून समानता, बंधुभाव आणि निःस्वार्थ सेवेचा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देण्यात आला. याचबरोबर गुरुद्वारा समितीच्या सेवादारांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात अनेक रक्तदात्यांनी सहभाग नोंदवून रक्तदान केले.

प्रकाश गुरुपुरब सोहळ्यादरम्यान समाजातील उल्लेखनीय कार्य आणि योगदानाबद्दल श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्ट, श्रीराम मंदिर, नवी पेठ यांना पंजाबी परिवाराच्या वतीने 'समाजरत्न पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या संस्थेचा या पुरस्काराच्या माध्यमातून सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी गुरुद्वारा समितीचे व शीख समाजाचे अध्यक्ष बलदेवसिंग वाही यांनी सर्व उपस्थित संगत, कीर्तन जथा, सेवादार, सामाजिक संस्था आणि कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, श्री गुरु नानक देव जी महाराज यांचा 'किरत करो, नाम जपो, वंड छको' हा महान संदेश मानवतेला समानता, प्रामाणिक कष्ट आणि निःस्वार्थ सेवेचा मार्ग दाखवतो. प्रत्येकाने गुरू महाराजांच्या शिकवणुकीचा अंगीकार करून समाजात प्रेम, बंधुभाव आणि एकता जोपासावी. कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन गुरुद्वारा भाई दया सिंगजी समितीच्या सर्व सेवादारांनी अत्यंत श्रद्धा, प्रेम आणि समर्पणाने केले होते. या प्रकाश गुरुपुरब सोहळ्यास अहिल्यानगर शहरासह परिसरातील विविध भागांतून तसेच बाहेरगावाहून समाजबांधव आणि महिला उपस्थित होत्या. धार्मिक कार्यक्रमांसोबतच रक्तदान, लंगर सेवा आणि सामाजिक संस्थेचा गौरव अशा उपक्रमांमुळे यंदाचा प्रकाश गुरुपुरब सोहळ्यात सेवा, समता, त्याग आणि बंधुभावाचा संदेश देण्यात आला.

कला केंद्रांवर कारवाई करावी अन्यथा ७ डिसेंबरला उपोषण

कमिटीच्या समर्पणामुळे अहिल्यानगरचा चातुर्मास ऐतिहासिक

उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी महाराज यांचे गौरवोद्गार; आनंद तीर्थ समवशरण येथे समारोप

नगर – जामखेड शहर तसेच मोहा हद्दीतील अनधिकृत कला केंद्रांविरोधात आणि तेथे सुरू असलेल्या कथित अवैध धंद्यांविरोधात अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघाचे अहिल्यानगर जिल्हा युवा जिल्हाध्यक्ष सचिन आजबे यांनी प्रशासनाकडे नाराजी व्यक्त केली आहे. वारंवार उपोषणे करूनही स्थानिक पातळीवर कोणतीही दखल किंवा कायदेशीर कारवाई होत नसल्याचा आरोप करत त्यांनी आता थेट नाशिक येथील विभागीय आयुक्तांकडे निवेदनाद्वारे कारवाईची मागणी केली असून, या निवेदनाची प्रत नाशिक परिक्षेत्राचे पोलीस महानिरीक्षक यांनाही माहितीस्तव रवाना करण्यात आली आहे.

यापूर्वी तहसील कार्यालय तसेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अनेक वेळा उपोषणे करण्यात आली. मात्र, अद्याप न्याय मिळालेला नाही किंवा ठोस कायदेशीर कारवाई झाल्याचे दिसून आलेले नाही. विभागीय आयुक्तांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून कठोर व कायदेशीर कारवाई करावी, अशी अपेक्षा निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. कारवाई न झाल्यास ७ डिसेंबर रोजी विभागीय आयुक्त कार्यालयासमोर उपोषण करण्याचा इशारा सचिन आजबे यांनी दिला आहे. तसेच, या काळात स्वतःच्या कुटुंबास काही विपरीत प्रकार घडल्यास किंवा जीवितहानी झाल्यास त्यास संबंधित प्रशासन व कला केंद्र मालक जबाबदार राहतील.

नगर – गुरुदेवांच्या आशीर्वादाने त्यांच्या कर्म भूमीतील चातुर्मास खूप आनंददायी ठरला. जी भक्ती, सेवा, समर्पण भाविकांमध्ये दिसली ती अद्भुत होती. धर्मसभेची रौनक भाविकांनी वाढवली. चार महिने निरंतर तोच उत्साह, उल्हास दिसून आला. नगरमध्ये २००७ मध्ये नवकार कलशपासून सुरू झालेली ही यात्रा नगरकरांच्या अपार प्रेमाची होती. चातुर्मास कमिटीच्या समर्पणामुळे हा चातुर्मास खऱ्या अर्थाने ऐतिहासिक ठरला आहे, अशा भावना उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा. यांनी व्यक्त केल्या.



आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासाची सांगता झाली.

आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे सुरू असलेल्या समर्पण चातुर्मासाची सांगता मंगळवारी झाली. याप्रसंगी महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., आलोकऋषीजी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा., विनिताश्रीजी म.सा., अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींच्या सान्निध्यात समारोप कार्यक्रम झाला. याप्रसंगी आमदार संग्राम जगताप, समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, पुणे येथील डॉ.कल्याण गंगवाल आदी उपस्थित होते. समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी उद्योगपती सौरभ प्रमिलाताई हेमराज बोरा व बोरा परिवार होता.

प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज म्हणाले, उपाध्यायश्रीजींचा गुरूदेवांच्या कर्म भूमीतील चातुर्मास अद्वितीय व ऐतिहासिक आहे. त्यांच्यासारखी साधना करणे खरच अद्भुत आहे. भव्य स्वरुपातील तपश्चर्या यावर्षी झाली ती कौतुकास्पद आहे. असा चातुर्मास दरवर्षी झाला पाहिजे.

प्रविणऋषीजी महाराज पुढे म्हणाले, नगरला यावर्षीचा चातुर्मास निश्चित केल्यानंतरही अनेक वादळे आली. पण गुरूदेवांची कृपा झाली, प्रवर्तकश्रीजींनी चातुर्मासासाठी आशीर्वाद दिले आणि हा चातुर्मास उत्साहात संपन्न झाला. आज मी खूप आनंदीत आहे. बाबूशेठ बोरा यांनी पुढाकार घेऊन मला आग्रह केला होता. सर्व जबाबदारी स्विकारून त्यांनी मोठी चांगली व्यवस्था सांभाळली. आदेश चंगेडिया यांनी संपूर्ण सजावट अतिशय आखीव रेखीव सुंदर केली. त्यामुळे वातावरण निर्मिती झाली. सोशल मीडियाचा खूप चांगला उपयोग करून चातुर्मास सर्वत्र पोहचवला. त्यांचा संपूर्ण परिवार खूप धार्मिक आहे. आदेश चंगेडिया यांनी चार महिने आपल्या व्यावसायिक कौशल्याची प्रचीती दाखवून दिली. विलास कटारिया यांनीही तन्मयतेने सेवा केली. राजकुमार बोरा यांनीही प्रत्येक व्यवस्थेची बारकाईने काळजी घेतली. राजेश भंडारी यांनी चातुर्मासात गौतम प्रसादीची जबाबदारी घेतली होती. परंतु सौरभ बोरा यांच्या आग्रहाखातर त्यांनी मोठा त्याग केला. विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा यांनी महत्त्वाचे योगदान दिले. अभय गांधी, अभिजीत गांधी यांच्या सारखी नवीन पिढी यानिमित्त सर्वांसमोर आली. सर्व ट्रस्टींच्या परिश्रमांचे कौतुक आहे. सौरभ बोरा व त्यांचा मित्र परिवार तसेच इतर अनेक सहकार्य करणारांचेही कौतुक आहे.

आ. संग्राम जगताप म्हणाले, प्रविणऋषीजी महाराज यांच्या चातुर्मासामुळे चार महिने संपूर्ण शहरात भक्तीमय वातावरण तयार झाले. या काळात अनेक मार्गदर्शन शिबिरे झाली. प्रत्येक व्यक्तीला या काळात चांगले विचार मिळाले. चातुर्मास कमिटीने खूप उत्तम व्यवस्था केली. सौरभ बोरा व मित्र परिवारानेही खूप मोठे योगदान दिले.

अशोक (बाबूशेठ) बोरा म्हणाले, गुरूदेवांचा चातुर्मास घोषित झाला आणि आम्ही ट्रस्ट मंडळ निर्माण केला. सर्व समर्पित ट्रस्टी यात जोडले गेले. गुरूकृपेने आम्ही एकसंघ राहून काम केले. गुरूदेवांनी विश्वासाने आम्हाला चातुर्मास प्रदान केला. या विश्वासाला खरे उतरण्याचा प्रामाणिक प्रयत्न आम्ही केला. सौरभ बोरा यांनी मुख्य लाभार्थी म्हणून खूप मोठे योगदान दिले. उद्या गुरूदेवांचा विहार होताना आमच्या डोळ्यात आनंदाश्रू असतील. चातुर्मास काळात श्रावक श्राविकांनी अभूतपूर्व प्रतिसाद दिला. त्यांच्याप्रतीही कृतज्ञता व्यक्त करतो.

आदेश चंगेडिया म्हणाले, समर्पण चातुर्मास काळाऊ कमिटीच्या वतीने काही कमतरता राहीली असेल तर क्षमा मागतो. आमचे एक ध्येय एकच होते की चातुर्मास सर्वोत्तम आणि कायम संस्मरणीय असा झाला पाहिजे. गुरूदेवांचे अनमोल मार्गदर्शन याकाळात मिळाले. मला सर्व सहकारी ट्रस्टींचेही खूप मोठे सहकार्य लाभले. या चातुर्मासामुळे युवा पिढीमध्येही मोठ्या प्रमाणावर धर्माप्रती आस्था जागृत झाली आहे. कमिटीचे ट्रस्टी सचिन देसरडा,

राजेश भंडारी यांनीही मनोगत व्यक्त करून चातुर्मास कमिटीला सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

आचार्यश्रीजींच्या ध्वनीमुद्रीत मंगल पाठाने कार्यक्रमाची सांगता झाली.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

विज्ञानवार्ता

दर्शन सुपरकिलोनोव्हाचे

अंतराळ संशोधकांनी अंतराळात एका अशा ताऱ्याचा शोध लावला आहे, ज्याचा एकदा नव्हे तर दोनदा स्फोट झाला असावा. शास्त्रज्ञांच्या मते, हा विज्ञानाला ज्ञात असलेला पहिला सुपरकिलोनोव्हा असू शकतो. ही घटना म्हणजे एका सुपरनोव्हा आणि दोन न्यूट्रॉन ताऱ्यांच्या विलीनीकरणातून तयार झालेली एक दुर्मीळ युती आहे.

या संशोधनाचा अहवाल 'ॲस्ट्रोफिजिकल जर्नल लेटर्स'मध्ये प्रसिद्ध करण्यात आला आहे. गेल्यावर्षीच्या ऑगस्ट महिन्यात अमेरिकेतील 'एलआयजीओ' आणि इटलीतील 'व्हीआयआरजीओ' या वेधशाळांनी अंतराळातून येणाऱ्या गुरुत्वीय लहरी (ग्रॅव्हिटीशनल वेव्ज) टिपल्या होत्या. सुमारे १.३ अब्ज प्रकाशवर्षे लांब असलेल्या दोन न्यूट्रॉन ताऱ्यांच्या टकरीमुळे या लहरी निर्माण झाल्या होत्या.

यातील सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे, या विलीनीकरणातील एका न्यूट्रॉन ताऱ्याचे वस्तुमान (मास) सूर्यापेक्षाही कमी असल्याचे दिसून आले. खगोलशास्त्रानुसार, न्यूट्रॉन ताऱ्याचे वस्तुमान सहसा सूर्याच्या १.४ पट असते. इतका लहान तारा सापडल्याने शास्त्रज्ञ चक्रावून गेले होते.



सुपरकिलोनोव्हा म्हणजे काय?

कॅलटेकमधील खगोलशास्त्रज्ञ मानसी कासलीवाल आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या घटनेचा सखोल अभ्यास केला. त्यांना असे आढळले की, प्रथम एका विशाल ताऱ्याचा सुपरनोव्हा स्फोट झाला. या स्फोटातून दोन लहान न्यूट्रॉन तारे तयार झाले. हे दोन लहान न्यूट्रॉन तारे पुन्हा एकमेकांवर आदळले आणि त्यातून किलोनोव्हा (ज्यामध्ये सोने आणि प्लॅटिनमसारख्या जड धातूंची निर्मिती होते) तयार झाला. जेव्हा या दोन्ही प्रक्रिया एकाच वेळी किंवा लागोपाठ घडतात, तेव्हा त्याला सुपरकिलोनोव्हा म्हटले जाते. सुरुवातीला हा प्रकाश किलोनोव्हासारखा लालसर होता; पण नंतर त्यात हायड्रोजनचे अंश दिसले, जे सुपरनोव्हाचे लक्षण आहे. यासंदर्भात युनिव्हर्सिटी ऑफ मेरीलँडचे खगोलशास्त्रज्ञ कोल मिलर म्हणतात, जर हे सत्य असेल, तर आपण विश्वातील अशा वस्तूबद्दल जाणून घेत आहोत जी यापूर्वी कधीही पाहिली गेली नाही. मात्र, हे पुरावे पूर्णपणे सिद्ध करण्यासाठी आणखी अशा घटनांचा अभ्यास होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. मानसी कासलीवाल यांच्या मते, निसर्गात अशा घटना नेहमी घडत नाहीत. २०१७ नंतर पहिल्यांदाच अशा प्रकारची गुरुत्वीय लहरी आणि प्रकाशाची जुळवाजुळव पाहायला मिळाली आहे. ♦♦♦

१७०० वर्षांपूर्वीचे मुखवट्यासह हेल्मेट

इसवी सन १७९६ मध्ये इंग्लंडमधील रिबचेस्टर येथे एका लहान मुलाला घरामागील शेतात खेळताना धातूच्या ३० हून अधिक वस्तूंचा खजिना सापडला. या शोधामुळे रोमन साम्राज्यातील एका अत्यंत दुर्मीळ आणि कलाकुसर असलेल्या 'कांस्य हेल्मेट'चा उलगडा झाला, जे आज 'रिबचेस्टर हेल्मेट' म्हणून जगप्रसिद्ध आहे.

१८१३ पासून ब्रिटिश म्युझियममध्ये जतन करून ठेवलेले हे हेल्मेट दोन प्रमुख भागांनी बनलेले आहे : **१. शिरस्त्राण** : ज्यावर युद्धाचे प्रसंग कोरलेले आहेत. **२. चेहरा मुखवटा** : जो एका तरुण मुलाच्या चेहऱ्यासारखा दिसतो. सुमारे १.३ किलोग्रॅम वजनाचे हे हेल्मेट रोमन काळातील ब्रिटनमध्ये सापडलेल्या अशा प्रकारच्या केवळ तीन मुखवटाधारी हेल्मेटस्पैकी एक आहे.



या हेल्मेटवर सहा अश्वदळ सैनिक आणि ११ पायदळ सैनिकांमधील युद्धाचे दृश्य कोरलेले आहे. यावर विजयाचे प्रतीक असलेली 'पामेटसस्'ची चिन्हे आणि शत्रूकडून जिंकलेली शस्त्रेही दर्शवण्यात आली आहेत. मुखवट्यावरील तरुणाचे केस सापांच्या चार डोक्यांसारखे दिसतात, जे 'मेड्युसा' या पौराणिक पात्राचा संदर्भ देतात. केसांवर शहराच्या भिंतीसारखा आकार असलेला 'कोरोना मुरॅलिस' नावाचा मुकुट आहे, जो रोमन सैन्यातील सर्वोच्च सन्मानांपैकी एक मानला जात असे. हे हेल्मेट प्रत्यक्ष युद्धासाठी वापरणे अशक्य होते; कारण त्यातील डोळ्यांची आणि नाकाची छिद्रे अत्यंत लहान होती. २०१९ मधील एका संशोधनानुसार, पुरातत्वशास्त्रज्ञांनी स्पष्ट केले की हे हेल्मेट 'हिप्पिका जिम्नेशिया' म्हणजेच अश्वदळाच्या स्पर्धांसाठी वापरले जात असे. हे एक प्रकारचे लष्करी सराव आणि करमणुकीचे कार्यक्रम असत, जिथे सैनिक ग्रीक किंवा ॲमेझॉन्सच्या वेशभूषेत आपली युद्धकला सादर करत. हे हेल्मेट कदाचित 'ब्रेमेटेनाकम वेटरनोरम' या रोमन किल्ल्याजवळ एका पेटीत साठवून ठेवले असावे. दुसऱ्या शतकाच्या शेवटी जेव्हा हा किल्ला ओस पडला, तेव्हा हा खजिना तिथेच गाडला गेला. तब्बल १७ शतकांनंतर एका लहान मुलाच्या शोधामुळे हा ऐतिहासिक वारसा पुन्हा जगासमोर आला.

आकाशात दिसणार शतकातील सर्वात तेजस्वी धूमकेतू?



१३ जानेवारी २०२६ रोजी चार हौशी खगोलशास्त्रज्ञांनी अटाकामा वाळवंटातून एका नवीन धूमकेतूचा शोध लावला आहे, ज्याला 'C/2026 A1 मॅप्स' असे नाव देण्यात आले आहे. हा धूमकेतू केवळ एक साधारण दगड नसून तो प्रसिद्ध 'क्रुट्झ सनग्रेझर' कुटुंबातील सदस्य आहे. या कुटुंबातील धूमकेतू इतिहासातील सर्वात भव्य आणि तेजस्वी मानले जातात. हा धूमकेतू सध्या अतिशय वेगाने सूर्याच्या दिशेने सरकत आहे. एप्रिल महिन्याच्या सुरुवातीला तो सूर्याच्या पृष्ठभागापासून अत्यंत जवळून, म्हणजेच केवळ १.२ लाख किलोमीटर अंतरावरून प्रवास करेल. शास्त्रज्ञांच्या मते, हा धूमकेतू सूर्याच्या इतक्या जवळ असेल की, एकतर तो प्रचंड प्रकाशाने चमकेल किंवा सूर्याच्या भीषण उष्णतेमुळे जळून त्याचे तुकडे होतील.

शास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की, हजारो वर्षांपूर्वी एका महाकाय धूमकेतूचे सूर्याजवळ आल्यावर तुकडे झाले होते. आज आपल्याला दिसणारे हे छोटे-मोठे धूमकेतू त्याच प्राचीन धूमकेतूचे भाग आहेत. १८८२ आणि १९६५ मध्ये दिसलेले 'महान धूमकेतू' (Great Comets) देखील याच कुटुंबातील होते, जे इतके तेजस्वी होते की भरदिवसाही आकाशात दिसत होते. धूमकेतू मॅप्सने आधीच एक विक्रम प्रस्थापित केला आहे. सूर्यापासून खूप लांब असतानाच याचा शोध लागला आहे, ज्यावरून असा संकेत मिळतो की याचा आकार बराच मोठा असू शकतो.

जर या धूमकेतूने सूर्याची उष्णता सहन केली, तर एप्रिलच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात आकाशात एक अद्भुत नजारा पाहायला मिळेल. याची चमक अपेक्षेप्रमाणे वाढली तर तो इतका प्रखर होऊ शकतो की दिवसाच्या उजेडातही साध्या डोळ्यांनी पाहता येईल. विशिष्ट कक्षेमुळे हा धूमकेतू जगाच्या दक्षिण गोलार्धातून अधिक स्पष्टपणे दिसेल. शास्त्रज्ञ अजूनही यावर बारीक लक्ष ठेवून आहेत. हा धूमकेतू सूर्याजवळ गेल्यावर पूर्णपणे सुरक्षित राहील की नाही, हे सांगणे सध्या कठीण आहे. मात्र, सर्वात रोमांचक बाब म्हणजे, जर सूर्याजवळ जाताना त्याचे तुकडे झाले, तर त्याची चमक अचानक कित्येक पटीने वाढू शकते. ♦♦♦



डूम्सडे ग्लेशियरच्या अंतरंगात...

पश्चिम अंटार्क्टिकातील थ्वेटस् ग्लेशियर सध्या ताज्या वैज्ञानिक विश्लेषणानुसार, जागतिक हवामान बदलाच्या केंद्रस्थानी आहे. शास्त्रज्ञ या हिमनदीला डूम्सडे ग्लेशियर म्हणजेच प्रलयाची हिमनदी असे म्हणतात. भविष्यात समुद्राची पातळी किती वाढणार, हे समजून घेण्यासाठी हे ठिकाण जगातील सर्वात महत्त्वाचे ठिकाण बनले आहे.

हा थ्वेटस् ग्लेशियर साधारणपणे फ्लोरिडा राज्याएवढा किंवा ब्रिटन देशाएवढा मोठा आहे. सध्या जगातील समुद्राची पातळी जी दरवर्षी वाढत आहे, त्यातील ४ टक्के वाटा एकट्या थ्वेटसब ग्लेशियरचा आहे. जर थ्वेटस् ग्लेशियर पूर्णपणे वितळला, तर समुद्राची पातळी सुमारे ६५ सेंटिमीटरने (२ फुटांहून अधिक) वाढू शकते. हा ग्लेशियर एका बुचासारखा (क्रॉक) काम करतो. या थ्वेटसब ग्लेशियरने आजूबाजूच्या इतर हिमनद्यांना अडवून धरले आहे. जर हा कोसळला, तर इतर हिमनद्याही वेगाने समुद्रात जातील, ज्यामुळे समुद्राची पातळी ३ मीटरपर्यंत वाढण्याचा धोका आहे. यामुळे मुंबई, न्यूयॉर्क, टोकियो यासारखी किनारपट्टीवरील शहरे पाण्याखाली जाऊ शकतात.

थ्वेटस् ग्लेशियर का वितळत आहे?

समुद्राचे गरम पाणी या हिमनदीच्या खालच्या थरापर्यंत पोहोचत आहे. हे पाणी हिमनदीला खालून हळूहळू वितळवत आहे. थ्वेटस् ज्या जमिनीवर आहे, ती जमीन आतल्या बाजूला खोल आणि उतरती आहे. त्यामुळे एकदा का पाणी आत शिरले की, ते हिमनदीला वेगाने मागे ढकलते. हिमनदीच्या समोर असलेले बर्फाचे कवच (आईस शेल्फ) आता कमकुवत झाले असून, त्याला मोठ्या भेगा पडत आहेत.

शास्त्रज्ञ आता आईसफिनसारख्या पाण्याखालील रोबोचा वापर करून या हिमनदीच्या अगदी खालच्या भागाचा अभ्यास करत आहेत. संशोधनात असे दिसून आले आहे की, गरम पाणी हिमनदीच्या भेगांमध्ये शिरून तिला आतून पोखरत आहे. हा थ्वेटस् ग्लेशियर पूर्णपणे कोसळायला कदाचित काही दशके किंवा शतके लागतील; पण त्याच्या वितळण्याचा वेग ज्या प्रकारे वाढत आहे, तो येणाऱ्या शतकासाठी एक मोठा इशारा आहे. ♦♦♦

कॅन्सरची चव ठरली जीवघेणी

सतराव्या शतकात जेव्हा विज्ञानाचा विकास होत होता, तेव्हा रोगांची कारणे शोधण्यासाठी वैद्यकीय तज्ज्ञ स्वतःच्या जीवावर उदार होऊन प्रयोग करत असत. असाच एक अंगावर काटा आणणारा प्रयोग लंडनमधील सेंट थॉमस हॉस्पिटलचे प्रसिद्ध सर्जन सॅम्युअल स्मिथ यांनी केला होता, ज्याचा शेवट त्यांच्या मृत्यूने झाला.



१७ व्या शतकाच्या पूर्वार्धात, सॅम्युअल स्मिथ यांनी एका महिलेच्या स्तनावर कर्करोगाची (ब्रेस्ट कॅन्सर) शस्त्रक्रिया केली. शस्त्रक्रियेनंतर, कर्करोगाच्या गाठीमध्ये असलेला द्रव किंवा रस नेमका कसा असतो, हे जाणून घेण्याची त्यांना उत्सुकता वाटली. त्यांनी आपल्या बोटाने त्यातील थोडा द्रव घेतला आणि तो चक्क आपल्या जिभेने चाखून पाहिला. स्मिथ यांनी तो द्रव जिभेला लावताच त्यांना एखाद्या तीव्र ॲसिडसारखा (जसे की सल्फ्यूरिक ॲसिड) झटका बसला. तो चटका जिभेवरून थेट घशापर्यंत गेला. त्यांनी तातडीने गुळण्या केल्या आणि भरपूर मद्य (वाईन) प्राशन केले, जेणेकरून ती चव निघून जावी. मात्र, ती विचित्र आणि भयानक चव त्यांच्या जिभेवरून कधीच गेली नाही. उत्तम प्रकृती असलेले स्मिथ या प्रयोगामुळे हळूहळू खंगत गेले. त्यांच्या मृत्युशय्येवर त्यांनी कबूल केले की, त्या कर्करोगाच्या चवीनेच त्यांचा बळी घेतला आहे. त्यांच्या मृत्यूपर्यंत ती चव त्यांच्या जिभेत कायम होती.

विज्ञानाचा विष सिद्धांत आणि मानवी भावना

